# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

रजि.नं.-ई-६९, अहमदनगर




# वार्षिक अहवाल २०१९-२०

# अनुक्रमणिका


| अ.नं. | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | प्रास्ताविक | ०१ |
| ०२ | श्री क्षेत्र शिर्डी चे महत्व व धार्मिक रुढी परंपरा | ०४ |
| ०३ | संस्थानमार्फत साजरे केले जाणारे उत्सव | ०७ |
| ०४ | मा. व्यवस्थापन समिती | ०९ |
| ०५ | मा. छाननी समिती | १० |
| ०६ | मा.तदर्थ (Ad-hoc) समिती | ११ |
| ०७ | विश्वस्तव्यवस्थेची कर्तव्ये व अधिकार | १२ |
| ०८ | प्रशासकीय कामकाज - मुख्य कार्यकारी अधिकारी / उपमुख्य कार्यकारी अधिकारी | १३ |
| ०९ | प्रशासनाची रचना | १५ |
| १० | भक्तमंडळ | २१ |
| ११ | विश्वस्तव्यवस्थेमार्फत देणेत येणाऱ्या सेवा-सुविधा | २२ |
| १२ | अहवाल सालातील ठळक बाबी | ४० |
| १३ | इतर उपक्रम – रुग्णालये | ४३ |
| १४ | इतर उपक्रम - शैक्षणिक संकुल | ५१ |
| १५ | इतर उपक्रम - श्री साईलीला (व्दैमासिक) | ५५ |
| १६ | सन २०१९-२० मधील ठळक आर्थिक बाबी | ५६ |
| १७ | विकासात्मक कामे - पूर्ण करणेत आलेले प्रकल्प | ५९ |
| १८ | विकासात्मक कामे - विश्वस्तव्यवस्थेचे प्रगतीपथावर असलेले प्रकल्प | ६० |
| १९ | विकासात्मक कामे - विश्वस्तव्यवस्थेचे नियोजित विकास प्रकल्प | ६१ |
| २० | विकासात्मक कामे - संस्थानमार्फत अर्थसहाय्य केलेले सार्वजनिक विकास प्रकल्प | ६५ |
| २१ | शताब्दी कक्ष | ६६ |
| २२ | अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत प्रकल्प | ६७ |
| २३ | लेखापरिक्षण अहवाल | ६८ |
| २४ | श्री साईंचे समाधी मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम सूची | १०३ |



# वार्षिक अहवाल २०१९-२०

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

# प्रशासकीय अहवाल - सन २०१९-२०

**(दिनांक ०१ एप्रिल २०१९ ते दिनांक ३१ मार्च २०२०)**

## प्रास्ताविक

दैत्य गुरू शुक्राचार्य यांची तपोभूमी अशी पौराणिक ओळख असलेल्या गोदावरीच्या दक्षिण तीरावर सव्वाशे-दिडशे वर्षापुर्वी जगाला शांती, समता, सर्वधर्मसमभाव, श्रद्धा-सबुरी व सबका मालिक एक अशी शिकवण देणा-या साईबाबांचे आगमन झाले आणि दैत्य भूमीला देवभूमीच रुप मिळाले. साईंच्या वास्तव्याने व पदस्पर्शाने इथला कणनकण पावन झाला. पंचेचाळीस-पन्नास वर्षाच्या वास्तव्यानंतर त्यांनी द्वारकामाई मंदिरात घेतलेला अखेरचा श्वास येथील वायुमंडलात विलीन झाला. येथील बुटीवाड्यातील समाधीच्या चौथ-यात त्यांचा पवित्र देह विसावला आहे. भाविकांच्या हाकेला धावणारे साईबाबा आजही जगभरातील करोडो भक्तांना शिरडीला ज्याचे पाय लागतील त्याला सुख-समृद्धीची व दुःखाचा नाश करण्याची ग्वाही देत आहेत.

साईबाबांच्या हयातीत प्रचार-प्रसारांची अगदी तुटपुंजी साधने असतांनाही देशाच्या अनेक प्रांतातुन लोक शिर्डी सारख्या खेडेगावात येत, अनेक दिवस राहत माझा माणुस जगात कोठेही असला तरी मी त्याला ओढुन आणीन व माझ्या समाधीनंतर शिर्डीत मुंग्यांसारखी गर्दी होईल हे त्यांच वाक्य आज सत्यात उतरलेल दिसत आहे.

जात, धर्म, पंथ, देश यातील भेदाभेद दुर करुन मानवजातीच्या कल्याणाकरिता प्रकटलेल्या या अवलियाच्या चरणी देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधानांपासून, राजकारणी, वैज्ञानिक, उद्योगपती, न्यायव्यवस्था व प्रशासनातील उच्च पदस्थ, सिनेसृष्टी व समाजकारणातील लाखो दिग्गजांच्या श्रद्धा स्थिरावल्या आहेत.

श्री साईबाबांचे सन १८५८ च्या सुमारास शिर्डी येथे आगमन झाले. त्यांचा धर्म, जात, पंथ, मूळगांव, नांव याबद्दल आजही गूढच आहे. त्याबद्दल कुठलीही खात्रीलायक माहिती मिळत नाही. त्यांना **“ साईबाबा ”** हे नांवही शिर्डी येथे आल्यावरच मिळाले. श्री साईबाबांनी भाविकांमध्ये माणूसकीचा प्रेमभाव जागृत केला. साईबाबा गरीब दीनदुबळयांवर व प्राणीमात्रांवर प्रेम करत. त्यांच्या अडचणी व संकटकाळात त्यांना मदत करीत असत. शिर्डी येथील आपल्या प्रदीर्घ वास्तव्यात त्यांनी अनेक भक्तांचे आजार स्वतः शुश्रुषा करुन बरे केले. श्रद्धा आणि सबुरी हा त्यांनी दिलेला संदेश-तथा-उपदेश जगातल्या सांसारिक आणि पारमार्थिक जनांना येणा-या समस्यांवरचा एक महान उपाय आहे. त्यांनी स्वहस्ते प्रजल्वीत केलेल्या व आजमितीसही अखंडपणे प्रज्वलीत असलेल्या धुनीतील उदीच्या सहाय्याने अनेक भक्तांचे असाध्य रोग बरे होतात अशी भाविक भक्तांची श्रद्धा आहे. अशा या महान अवतारी पुरुषाची ख्याती सर्वत्र पसरली आणि सर्वधर्मीय भक्तलोक त्यांच्याकडे आकर्षित होऊ लागले. भक्त बाबांचे शुभाशिर्वाद घेण्यासाठी येत व त्यांच्या चरणी दक्षिणा किंवा वस्तू अर्पण करीत.

आजही संपूर्ण जगातून सर्वधर्माचे लोक साईसमाधीच्या दर्शनास येत आहेत. म्हणून या श्रध्दास्थानांस, बाबांच्या समाधी मंदिरास आज एकात्मिक व वैश्वीक मंदिराचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

श्री साईबाबांच्या इच्छेनुसार नागपूरचे गोपाळराव उर्फ बापूसाहेब बुटींनी १९१४ साली बुटी वाडा या वास्तूची निर्मिती सुरु केली. वाड्याच्या तळमजल्यावर गाभा-यात मुरलीधराची मुर्ती स्थापन करावी अशी त्यांची इच्छा होती. वाडियांत पडो हे शरीर | अंती बाबांचे जे उद्धार || तोचि शेवटी ठरला विचार | जाहले मुरलीधर बाबाचि || ३६ || (श्री साईसच्चरीत अध्याय ४४ वा) श्री साईबाबा हे शिर्डी येथे भारतीय सौर ७ शके १८४० आश्विन शुद्ध दशमी मंगळवार दि.**१५ ऑक्टोबर, १९१८** रोजी दुपारी पंचतत्वात विलीन झाले. बाबांनी अंतिमक्षणी मला वाड्यात घेऊन चला अशी दिलेली आज्ञा मानून बुटींसह सर्व भक्तांनी मुरलीधरासाठी बनविण्यात आलेल्या चौथ-याच्या जागी समाधी तयार करण्याचा निश्चय केला.

श्री साईबाबा इहलोक सोडून गेल्यानंतर, त्यांच्या इच्छेप्रमाणे नागपूरचे लक्षाधीश कै.गोपाळराव मुकूंद बुटी यांनी बांधलेल्या भव्य वाड्यात त्यांना ठेवण्यात आले व तीच जागा आज समाधी मंदिर म्हणून ओळखले जाऊ लागले. काही भक्तांच्या इच्छेनुसार प्रमुख भक्तांची एक व्यवस्थापक समिती बनवून त्यांची साधुपुरुष म्हणून तेव्हापासूनच पूजाअर्चा करण्याचे सदर समितीने चालू केले आणि भंडा-याचे दिवसापासून म्हणजे दि.२७ ऑक्टोबर १९१८ पासून **“ साई समर्थ साईनाथ कोठी ”** नांवाचा फंड, मंदिरांत व इतर ठिकाणी पूर्वीप्रमाणे पुजाअर्चा चालू ठेवण्यासाठी सुरु केला. मंदिरामध्ये बाबांनी वापरलेल्या वस्तूही ठेवण्यात आल्या. बाबांची बसण्याची, भक्तांना भेटण्याची जागा व इतर ठिकाणांची निगा राखण्याची व्यवस्था करण्यात आली.

व्यवस्थापक समितीने अहमदनगरच्या जिल्हा न्यायालयात वाजवी मदतीसाठी सन १९२१ चा दिवाणी दावा लावला. त्यानुसार जिल्हा न्यायालयाने १३ फेब्रुवारी १९२२ साली श्री साईबाबांच्या संस्थानचा कारभार योग्यरितीने पाहण्यासाठी व संस्थानच्या मालकीच्या मालमत्ता व मिळकतीची व्यवस्था पाहण्यासाठी एक योजना मंजुर केली. त्यानंतर कोर्टाचे प्रतिनिधी यांनी शिर्डी येथे येऊन सर्व स्थावर जंगम मिळकत श्री.मोरेश्वर प्रधान व इतर चार विश्वस्तांच्या ताब्यात देण्यात आली. त्यानंतर कै.दासगणू महाराजांच्या अध्यक्षतेखाली पहिल्या समितीची स्थापना होऊन दि.०६ एप्रिल, १९२२ (श्री रामनवमी) रोजी १ ली सभा झाली. त्यात पाच आजीवसह १५ सदस्य होते.

कमिटीकडे सोपविण्यांत आलेल्या अधिकारान्वये वेळोवेळी पूर्वी केलेल्या कानूनमध्ये बदल करुन सुधारीत कानून करण्यात आले. हे सुधारलेले कानून दि.०१ ऑक्टोबर १९४१ पासून अंमलात आले. तद्नंतर जिल्हा न्यायालयाने सन १९५१ ची संकीर्ण अर्जी नं.१७ यावरुन थोडा फेरफार करुन सन १९२२ ची त्यावेळची मुळची योजनाच जवळजवळ मंजुर केली. संस्थानचा कारभार लोकशाही पद्धतीनुसार चालविण्यात यावा असे ठरविण्यात आले. सन १९५१ ची नवी योजना स्वयंपूर्ण असल्यामुळे सन १९२२ च्या जुन्या योजनेतील कलमे तीने जवळजवळ रद्द केली. सन १९५१ ला जिल्हा न्यायालयाने मॅनेजिंग कमिटीला नियम व कानून करण्याचा अखत्यार दिला.

त्याप्रमाणे दि.१३ सप्टेंबर १९५४ रोजी भक्तमंडळाने निवडलेल्या पोट-कमिटीने आवश्यक कानून व नियम यांचा मसुदा तयार करुन त्यात एकंदर सर्व योजना व व्यवस्थेबाबतचे सविस्तर उक्त कानून व नियम समाविष्ट करण्यात आले, आणि ती योजना व ते कानून व नियम भक्तमंडळाकडून दि.०५ ऑक्टोबर १९५५ रोजी व दि.२० नोव्हेंबर १९५५ रोजी आणि दि.१८ डिसेंबर १९५५ रोजी भरलेल्या भक्तमंडळाच्या विशेष साधारण सभेत स्विकारण्यात आले.

यासंबंधाने लागणारी जिल्हा न्यायालयाची जरुर ती मंजुरीही दि.११ मे १९५६ रोजी संकीर्ण अर्ज नं.२०/५६ अन्वये मिळाली. सदर कानून व नियम दि.११ मे १९५६ रोजी अंमलात आले. त्यानुसार सन १९५६ ते १९६२ पर्यंत सदर समितीकडे कारभार होता. तदनंतर सन १९६२ ते १९८४ या कालावधीत मा.सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांच्या नियंत्रणाखाली संस्थानचे कामकाज मा.कोर्ट रिसिव्हर हे पाहत होते.

संस्थान ट्रस्टच्या एकुण उत्पन्नात होत असलेली लक्षणीय वाढ तसेच भक्तांची दिवसेंदिवस वाढत असलेली संख्या व त्यांना पुरविण्यात येणा-या सुविधा आणि देशाच्या रचनेतील महत्वाचे बदल, समाजाच्या धार्मिक तसेच धर्मादाय संस्थांविषयीच्या संकल्पना यांचा विचार करुन जमा झालेला निधी गोर-गरीब, दीन-दुबळया व गरजू जनतेच्या कल्याणासाठी उपलब्ध करण्याचे ठरविण्यात आले. तसेच उत्तम प्रशासन व नियंत्रणासाठी मा.दिवाणी न्यायालय, मुंबई यांचे दि.१८ ऑक्टोबर १९८२ (दावा नं.३४५७/६०) चे आदेशानुसार योजना तयार करण्यात आली.

मा.दिवाणी न्यायालय, मुंबई ने तयार केलेल्या योजनेनुसार संस्थान व्यवस्थापनाचा कारभार मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नियंत्रणाखाली व त्यांनी नियुक्त केलेल्या विश्वस्तमंडळामार्फत सन १९८४ ते माहे ऑगस्ट २००४ अखेर सुरु होता.

त्यानंतर, महाराष्ट्र शासनाने शिर्डी संस्थान ऑफ श्री साईबाबा या नांवाने नोंदणी झालेली श्री साईबाबा संस्थानची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करण्याकरीता आणि विश्वस्तव्यवस्थेला जनतेसाठी अधिक व्यापक कल्याणकारी योजना हाती घेणे शक्य व्हावे म्हणून, तिचे अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापन, प्रशासन व नियंत्रण करण्यासाठी **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४** चा कायदा संमत केला. तो दि.२३ ऑगस्ट २००४ रोजी अंमलात आलेला आहे.

सदर नमूद केलेल्या अधिनियमात सन २०११, २०१३ व २०१७ साली काही दुरुस्त्या करण्यात येऊन त्याप्रमाणे अधिनियम अद्ययावत करण्यात आले. त्यास अनुसरुन आज संस्थानचे कामकाज चालू आहे.

साईबाबांचे मुळ नांव, जात, धर्म अज्ञात असल्याने ते प्रत्येक धर्मियाला आपले वाटतात. जगभर सर्वधर्म समभावाचे प्रतिक म्हणून आज ते ओळखले जातात. साईंचे समाधी शताब्दी वर्ष नुकतेच दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत साजरे झाले. आपण साईबाबांच्या हयातीत जन्मलो नसलो तरी त्यांच्या समाधी शताब्दी वर्षाचे साक्षीदार होण्याच भाग्य आपल्या सर्वांना लाभल. या शताब्दीतील साई समाधीचे दर्शन आपल्या आयुष्यातील एक अमुल्य ठेवा व सुवर्णक्षण ठरला आहे. समाधी शताब्दीचा ऐतिहासिक कालावधी संस्मरणीय करण्यासाठी साईबाबा संस्थान, शिर्डी नगरपंचायत व ग्रामस्थांनी विविध

सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. या निमित्ताने देशातील विविध शहरात बाबांच्या पादुकांचा दौराही आयोजित करण्यात आला होता. विविध ठिकाणच्या साई मंदिरांचे व्यवस्थापनही यात आनंदाने सहभागी झाले.

## श्री क्षेत्र शिर्डीचे महत्व व धार्मिक रुढी परंपरा

प्रतिदिनी सुमारे ५० हजार भक्त श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देऊन, श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतात. उत्सवकाळात तसेच उन्हाळी सुट्टया, दीपावली व नाताळच्या सुट्टया, गुरुवार व रविवार तसेच या दिवसांना जोडून येणाऱ्या सरकारी सुट्टया इत्यादी काळात श्री क्षेत्र शिर्डीस भेट देणाऱ्या साईभक्तांची प्रतिदिन संख्या सुमारे २ ते ३ लाखांपर्यन्त जाते. श्री क्षेत्र शिर्डी येथे विविध पवित्र स्थाने असून, साईभक्त याठिकाणी आवर्जून भेट देऊन, आपली मनोकामना पूर्ण व्हावी म्हणून श्री साईंना साकडे घालतात.

**श्री क्षेत्र शिर्डी येथील दर्शनाची पवित्र स्थाने**

### ०१. समाधी मंदिर

समाधी मंदिर हे मुख्य मंदिर आहे. मंदिराची ही इमारत नागपूरचे निस्सीम साईभक्त श्री.गोपाळराव तथा बापूसाहेब बुट्टी यांनी बाबांच्या आशीर्वादाने बांधलेली आहे. **“ बुट्टी वाडा ”** या नावानेही ही वास्तू ओळखली जाते. या ठिकाणी **श्री साईबाबांची पवित्र समाधी व मूर्ती** आहे. श्री साईंच्या महासमाधीनंतर सुरु असणारे नित्यक्रम पूजा-अर्चा, आरत्या, धार्मिक उत्सव आदि या ठिकाणी नित्यनियमाने सुरु आहेत. समाधी मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम पहाटे ०४.३० ते रात्रौ १०.३० वाजेपर्यन्त सलग सुरु असतात. यामध्ये श्रींची पहाटे ०४.३० वा. काकड आरती, मंगलस्नान, दुपारी १२.०० वाजता माध्यान्ह आरती, सूर्यास्ताचे वेळी धूपारती व रात्री १०.३० वाजता शेजारती आदि नित्यक्रमांचा समावेश आहे.

तसेच, प्रत्येक गुरुवारी रात्रौ ९.१५ वाजता समाधी मंदिरातून श्री बाबांच्या पवित्र पादुका, सटका व फोटोची मिरवणूक निघून व्दारकामाई मंदिरात जाते व तेथून पालखीने चावडी मंदिरापर्यन्त जाऊन पुन्हा समाधी मंदिरात येते.

### ०२. गुरुस्थान मंदिर

बाबा सोळा वर्षांचे असताना ज्या ठिकाणी प्रथम दृष्टीस पडले ते हे समाधी मंदिर परिसरातील ठिकाण. बाबा हे ठिकाण त्यांच्या गुरुचे आहे, असे सांगत असत. श्री साईसच्चरित्रात उल्लेख असलेला **प्रसिध्द निंबवृक्ष (लिंब)** येथे आहे. या ठिकाणी गुरुवारी व शुक्रवारी उद (लोबान, धूप) जाळल्यास भाविकांचे दु:खपरिहार होते, असा श्री साई सच्चरित्राचा दाखला आहे.

श्री गुरुस्थान मंदिरात दैनंदिन पूजा-अर्चेबरोबरच सकाळी ११.३० वाजता व सायंकाळी धूपारतीनंतर नैवेद्य दाखविला जातो. गुरुस्थान मंदिरासमोर असलेली धुनी दर गुरुवारी व शुक्रवारी प्रज्वलीत केली जाते. गुरुपौर्णिमा उत्सवात गुरुस्थान मंदिरात रुद्राभिषेकाची महापूजा करण्यात येते.

### ०३. द्वारकामाई (मशीद)

बाबा शिर्डीस आल्यापासून समाधिस्त होईपर्यत दिर्घकाळ त्यांचे वास्तव्य सलग ६० वर्षे समाधी मंदिर परिसरात असलेल्या या व्दारकामाईत (मशीद) होते. असंख्य भक्तांना या ठिकाणी बाबांनी कृपाप्रसाद दिला. बाबा ज्या **शिळेवर** बसत असत ती येथेच आहे. शिवाय बाबांनी प्रज्वलित केलेली **पवित्र धुनी** याच ठिकाणी आजही अखंडपणे प्रज्वलीत आहे. भक्तांच्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी तसेच विविध आजार बरे करण्यासाठी बाबा याच धुनीतून उदी देत असत. आजही भक्तांना दिली जाणारी **पवित्र उदी** याच धुनीतून प्राप्त होते. बाबा येथेच स्वत: अन्न शिजवून भक्तांना वाढीत असत.

व्दारकामाई मंदिर पहाटे ०३.४५ वाजेपासून रात्रौ ९.३० वाजेपर्यन्त उघडे असते. व्दारकामाई मंदिरात दररोज सकाळी ८ वा. न्याहारीचा नैवेद्य दाखविणेत येतो. त्यानंतर सकाळी ११.३० वाजेचे दरम्यान अखंड प्रज्वलीत धुनीपुढे वैश्वदेवपूजा व श्रींचे तसबिरीची पूजा करणेत येऊन घंटानाद केला जातो. तसेच सायंकाळी धूपारतीनंतर झुणका-भाकरीचा नैवेद्य दाखविला जातो. **दर गुरुवारी** रात्री निघणाऱ्या श्रींचे पालखीचे आगमन द्वारकामाईत झालेनंतर रात्रौ ०९.१५ ते ०९.३० वाजेपर्यन्त भजन केले जाते.

### ०४. चावडी

चावडी हे ठिकाण समाधी मंदिराच्या पूर्वेला असून व्दारकामाई पासून अगदी जवळच आहे. बाबा व्दारकामाईत दिवसाआड **मुक्काम करत असत**. तसेच प्रत्येक गुरुवारी मिरवणुकीने व्दारकमाईतून चावडीत येऊन मुक्काम करत असत. आताही प्रत्येक गुरुवारी रात्रौ ९.१५ ते १०.०० या वेळेत समाधी मंदिरातून व्दारकामाईमार्गे चावडीकडे पालखी मिरवणूक निघत असते. या पालखीत बाबांची तसबीर, सटका व पादुका ठेवलेल्या असतात.

चावडी मंदिर पहाटे ०३.४५ वाजेपासून रात्रौ ९ वाजेपर्यन्त उघडे असते. या वेळेमध्ये दैनंदिन पूजा-अर्चा केली जाते.

### ०५. लेंडीबाग (प्रधान बाग)

मंदिर परिसरातच असलेल्या या ठिकाणी बाबा फेरफटका मारावयास जात असत. बाबांनी स्वत: या ठिकाणी लावलेल्या पिंपळ वृक्षाशेजारी **नंदादीप** अखंडपणे तेवत ठेवलेला आहे. शिवाय येथे **श्री दत्त मंदीर** असून बाबांचा आवडता घोडा **श्यामकर्ण (श्यामसुंदर)** जवळच चिरनिद्रा घेत आहे. तसेच जवळच बाबांची

**शिवडी ( विहीर )** आहे. बाबांच्या वेळचे मुंबई येथील एक भक्त रावबहादूर श्री.मोरेश्वर विश्वनाथ प्रधान, यांनी लेंडीबाग खरेदी करुन साईचरणी अर्पण केली म्हणून या बागेला **" प्रधान लेंडीबाग "** असेही म्हणतात.

तसेच याच परिसरात भक्तांना श्री साईसच्चरित्राचे वाचनासाठी **पारायण कक्ष** उघडणेत आलेला आहे. या पारायण कक्षात एकाच वेळेस सुमारे ५० भक्त सेवाभावाने पारायण करु शकतात, संस्थानमार्फत या भक्तांना पारायणासाठी संस्थान प्रकाशित सर्व भाषांमधील साईचरित्र ग्रंथ उपलब्ध करुन दिले जातात.

**०६. वस्तू संग्रहालय (म्युझियम)**

सन २००३ मध्ये मंदिर परिसरातील दिक्षितवाड्यात व त्या शेजारील नव्या इमारतीत वातानुकूलीत **वस्तूसंग्रहालय (म्युझियम)** तयार करणेत आले आहे. येथे श्रीं नी वापरलेला अंगरखा, जोडे, चिलिमा, श्रींचे महानिर्वाणानंतर त्यांना ज्या लाकडी पलंगावर स्नान घालणेत आले तो पलंग तसेच श्री साईबाबांनी हाताळलेल्या विविध वस्तु, साहित्य, छायाचित्रे इत्यादी एकत्र करुन, माहितीसह सुसूत्र पध्दतीने ठेवण्यात आलेले आहे. वस्तू संग्रहालय सर्व भक्तांसाठी सकाळी ०६ ते रात्री ०९ वाजेपर्यंन्त विनामुल्य खुले असते.

**०७. इतर स्थाने**

श्री साईबाबांच्या सानिध्यात राहिलेले त्यांचे परमभक्त कै.तात्या पाटील कोते, कै.भाऊ महाराज कुंभार, कै. व्ही. पद्मनाभ अय्यर, कै. नानावली, कै. अब्दुलबाबा यांची समाधीस्थळे मंदिर परिसरातील लेंडीबागेजवळ आहेत. येथेच बाजूला श्री दत्त मंदिर व नंदादिप देखील आहे. तसेच येथे बाबांच्या काळापासून असलेली विहीर (बावडी) देखील आहे.

**०८. इतर ग्रामदेवतांची मंदिरे**

संस्थान मंदिर परिसरातच **"श्री गणेश, श्री शनी व श्री महादेव"** या ग्रामदेवतांची मंदिरे असून संस्थान मार्फत त्यांचे नुतनीकरण करण्यात आलेले आहे. मंदिर परिसरानजीकच **"दक्षिणमुखी श्री हनुमान मंदीर"** असून या मंदिरातील दैनंदिन धार्मिक विधी, पूजाअर्चा संस्थानमार्फत नियमितपणे करणेत येत आहे. श्री हनुमान मंदिराचा संस्थानमार्फत जीर्णोद्धार करणेत आलेला असून तेथे प्रशस्त अशा नवीन मंदिराची रचना करण्यात आली आहे. या जीर्णोद्धार करण्यात आलेल्या मंदिरात श्री हनुमानाची ०५ फुट उंचीची सुंदर मुर्ती बसविणेत आली आहे.

**०९. श्री खंडोबा मंदिर**

खंडोबा मंदिर शिर्डी बसस्थानकाजवळ, श्री साईबाबा हॉस्पीटल शेजारी आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील धूपखेडा येथील चाँद पाटलाचे पत्नीच्या भाच्याचे लग्नाचे वऱ्हाड जेव्हा शिर्डीत आले तेव्हा या मंदिराजवळील वटवृक्षातळी ते उतरले होते. या वऱ्हाडासोबत आलेले बाल फकीर जेव्हा मंदिराच्या पटांगणात सर्वांसमवेत उतरले, तेव्हा मंदिराचे पुजारी म्हाळसापती यांनी या बाल फकिराचे **" आओ साई "** म्हणून स्वागत केले. तेव्हांपासून त्यांचे **" साई "** हे नांव प्रचलित झाले.

याशिवाय शिर्डीपासून पूर्वेस ०३ किलोमीटर अंतरावर बिरेगांव बनामध्ये **" श्री विरभद्र "** या ग्रामदेवतेचे मंदिर आहे.

# संस्थानमार्फत साजरे केले जाणारे उत्सव

## ०१. श्री रामनवमी उत्सव

श्री.गोपाळराव गुंड म्हणून बाबांचे भक्त होते. बाबांच्या कृपेने त्यांना पुत्रसंतान प्राप्त झाली. या आनंदाप्रित्यर्थ शिर्डीत दरवर्षी यात्रा किंवा उरुस भरवावा अशी त्यांची कल्पना होती. बाबांच्या आशिर्वादाने आणि गावक-यांच्या सहकार्याने ही कल्पना प्रत्यक्षात आली. त्याच मुर्त स्वरुप म्हणजे सन १८९७ पासून शिर्डीत रामनवमीच्या दिवशी उरुस यात्रा भरु लागली. पुढे १९११ मध्ये या उत्सवात रामनवमी उत्सवाची भर पडली. एकाच दिवशी हे दोन्ही उत्सव हिंदू-मुस्लीम बांधव गुण्यागोविंदाने साजरे करतात.

साई काळात सुरु झालेला श्री रामनवमी उत्सव श्री क्षेत्र शिर्डी येथे आजही अत्यंत भव्य स्वरुपात व उत्सवाहाने साजरा केला जातो. दरवर्षी साधारणपणे तीन दिवस हा उत्सव साजरा करण्यात येतो. श्री रामनवमी उत्सवानिमित्त राज्याच्या विविध भागातून दोनशेहून अधिक पालख्या घेऊन पदयात्री येथे येत असतात. उत्सवाप्रित्यर्थ तीनही दिवस कीर्तन तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. मुख्य दिवशी द्वारकामाईतील गव्हाचे पोते बदलण्यात येते. तत्पूर्वी ते समाधी मंदिरात आणून त्याची पूजा करण्यात येते. जुने पोत्यातील गहू दळून तो प्रसादालयात भाविकांच्या प्रसाद भोजनासाठी वापरण्यात येतो. मंदिरात रामजन्माचा कार्यक्रम असतो. याच दिवशी द्वारकामाई मंदिरावरील निशाणे बदलण्यात येतात. सायंकाळी साईभक्त अब्दुलबाबांचे झोपडीतून संदल मिरवणूक काढतात. या मिरवणूकीकडे हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतीक म्हणून पाहिले जाते.

## ०२. श्री गुरुपौर्णिमा उत्सव

साईबाबांना गुरु मानणारे त्यांचे अनेक भक्त आहे. पण शिष्य म्हणून साईबाबांनी कोणाचाही स्विकार केला नाही आणि आपले गुरु कोण आहेत हेही त्यांनी कधी सांगितलं नाही. परंतु आपल्या हयातीतच त्यांनी शिर्डी येथे गुरुपौर्णिमा उत्सवाची सुरुवात केली. याची हकीगत अशी : १९०८ च्या गुरुपौर्णिमेच्या दिवशी बाबांनी तात्यासाहेब नुलकरांना द्वारकामाईत असलेल्या खांबाची पूजा करायला सांगितले. माधवराव देशपांडे यांनाही पूजा करायला सांगितली. परंतु खांबाची पूजा न करता प्रत्यक्ष तुमची पूजा करु असे माधवराव म्हणाले. अखेर बाबांनी अनुमती दिली. त्यानंतर तात्यापाटील कोते, दादा केळकर यांनीही बाबांची पूजा केली. ती शिर्डीत झालेली पहिली गुरुपौर्णिमा. ती प्रथा आजही अबाधित असून तेव्हापासून शिर्डीत दरवर्षी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा केला जातो. हा उत्सवही रामनवमी व पुण्यतीथी उत्सवाप्रमाणे तीन दिवसांचा असतो. उत्सवाप्रित्यर्थ तीनही दिवस कीर्तन तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. उत्सवाच्या पहिल्या दिवशी श्री साईसच्चरिताचे द्वारकामाईत अखंड पारायण सुरु होऊन दुस-या दिवशी पारायणाची समाप्ती होते. उत्सवाच्या पहिल्या दिवशी श्रींची प्रतिमा पालखीत ठेऊन गावातून मिरवणूक काढण्यात येते. तर दुस-या दिवशी रथामधून श्रींच्या प्रतिमेची गावातून मिरवणूक काढण्यात येते. या उत्सवास विशेषतः मुंबई तसेच पुणे, औरंगाबाद इ. ठिकाणाहून हजारो साईभक्त पदयात्रेद्वारे बाबांची पालखी घेऊन शिर्डीत येतात.

## ०३. श्री पुण्यतिथी (विजयादशमी / दसरा) उत्सव

श्री साईबाबांचे महानिर्वाण मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर, १९१८ रोजी झाले. तो दिवस विजयादशमी म्हणजेच दस-याचा होता. तेव्हापासून त्यांचा पुण्यतिथी उत्सव दरवर्षी विजयादशमीस साजरा केला जातो. या उत्सवाला साईभक्तांच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्व आहे. म्हणूनच या उत्सवास लाखो साईभक्त श्रद्धेने हजेरी लावतात. बाबा त्यांच्या हयातीत दररोज भिक्षा मागून आणीत. त्याचे प्रतीक म्हणून या उत्सवात, मुख्य दिवशी म्हणजे विजयादशमीचे दिवशी सकाळी गांवातून भिक्षा झोळी कार्यक्रम आयोजित केला जातो. या कार्यक्रमात मा.व्यवस्थापन समितीच्या सदस्यांसह, ग्रामस्थ व साईभक्तही सहभागी होतात. याच दिवशी समाधी मंदिरात **आराधना विधी (श्राध्दविधी)** मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून सपत्नीक केला जातो. हा उत्सव तीन दिवसांचा असतो. उत्सवाप्रित्यर्थ तीनही दिवस कीर्तन तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. उत्सवाच्या पहिल्या दिवशी श्री साईसच्चरिताचे द्वारकामाईत अखंड पारायण सुरु होऊन दुस-या दिवशी पारायणाची समाप्ती होते. उत्सवाच्या पहिल्या दिवशी श्रींची प्रतिमा पालखीत ठेऊन गावातून मिरवणूक काढण्यात येते. तर दुस-या दिवशी रथामधून श्रींच्या प्रतिमेची गावातून मिरवणूक काढण्यात येते. दस-याच्या दिवशी **सिमोल्लंघन** केले जाते.

श्री साईबाबांचे हयातीपासून व त्यानंतर आजतागायत वरील तीनही उत्सव मोठया उत्साहात साजरे केले जातात. या तीनही उत्सवांच्या निमंत्रण-कार्यक्रम पत्रिका व उदीप्रसाद भक्तमंडळाच्या सभासदांना पाठविणेत येतो. मा. व्यवस्थापन समितीचे मार्गदर्शन व नियंत्रणाखाली, उपरोक्त उत्सवांसह अहवाल सालात, गुढीपाडवा, रंगपंचमी, गोकुळअष्टमी, महाशिवरात्र, श्री दत्त जयंती, कोजागिरी पौर्णिमा, आषाढी व कार्तिकी एकादशी, हनुमान जयंती, श्रावणी सोमवार, नारळी पौर्णिमा, पोळा, गणेश चतुर्थी, अनंत चतुर्दशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, दीपावली, बलिप्रतिपदा, तुळशी विवाह सोहळा इत्यादी सण-उत्सव रुढी परंपरेनुसार व धार्मिक रिती-रिवाजानुसार मोठया उत्साहात साजरे करण्यात आले.

याव्यतिरिक्त साईभक्तांसाठी देणगी मुल्य आकारुन, स्वतंत्र कक्षामध्ये दररोज सकाळी श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण) पुजा व अभिषेक पुजा पार पाडल्या जातात. या दैनंदिन उपक्रमात साईभक्त मोठया प्रमाणावर सहभागी होतात. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या व्यवस्थापनाखाली असलेल्या सर्व मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम, पूजा-अर्चा, आरत्या आदि बाबी मंदिर विभागामार्फत नित्यनियमाने, अखंडीतपणे पार पाडल्या जातात.

# मा. व्यवस्थापन समिती

मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना **दिनांक २८ जुलै, २०१६** अन्वये संस्थानाचे दैनंदिन कामकाजाचे व्यवस्थापनासाठी गठीत केलेली व सन २०१९-२० मध्ये कार्यरत असलेली व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे.

| मा. व्यवस्थापन समिती | | |
|---|---|---|
| **अ.नं.** | **सदस्याचे नांव** | **पद** |
| ०१ | **श्री. सुरेश काशिनाथ हावरे** | **अध्यक्ष** |
| ०२ | **ॲड. मोहन मोतीराम जयकर** | **सदस्य** |
| ०३ | **डॉ. राजेंद्र राजा बाली सिंह** | **सदस्य** |
| ०४ | **श्री. भाऊसाहेब राजाराम वाकचौरे** | **सदस्य** |
| ०५ | **श्री. बिपिनदादा शंकरराव कोल्हे** | **सदस्य** |
| ०६ | **अध्यक्ष, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी**<br>सौ. योगिताताई अभय शेळके पाटील<br>श्रीमती अर्चना उत्तमराव कोते | **पदसिध्द सदस्य**<br>दि. २६.०६.२०१९ अखेर<br>दि. २७.०६.२०१९ पासून |

उपरोक्त मा. व्यवस्थापन समितीच्या अहवाल सालात **एकूण ०५ सभा** झालेल्या आहेत.

# मा. छाननी समिति

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील कलम २१ (२) च्या परंतुकानुसार मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-१०१६/१३१४/प्र.क्र.१६५/का.१६, दिनांक ०५ जानेवारी, २०१७ अन्वये खालीलप्रमाणे **छाननी समिती** गठीत करणेत आलेली आहे.

| मा. छाननी समिति | | |
|---|---|---|
| **अ.नं.** | **सदस्याचे नांव** | **पद** |
| ०१ | **जस्टिस श्री. के. यु. चांदिवाल,<br>माजी न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई** | **अध्यक्ष** |
| ०२ | **श्री. सुरेश काशिनाथ हावरे** | **सदस्य** |
| ०३ | **श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम** | **सदस्य**<br>दिनांक ०७/०३/२०१९ अखेर राजीनामा |

अहवाल सालात, मा.छाननी समितीची **सभा झालेली नाही.**

# मा. तदर्थ (Ad-hoc) समिती

मा.व्यवस्थापन समितीचा कालावधी जुलै, २०१९ मध्ये संपलेला असल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.०९ ऑक्टोबर, २०१९ चे आदेशान्वये तदर्थ (Ad-hoc) समितीची नेमणूक केलेली आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे समिती सदस्यांचा समावेश आहे.

| मा. तदर्थ (Ad-hoc) समिती | | |
|---|---|---|
| **अ.नं.** | **सदस्याचे नांव** | **पद** |
| ०१ | **प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर**<br>**न्या. श्री. श्रीकांत ल. आणेकर** | **सदस्य** |
| ०२ | **मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**<br>**श्री. दीपक मुगळीकर, भा.प्र.से. (दि.२८.०३.२०१९ ते दि.१९.०२.२०२०) /**<br>**श्री. रविंद्र ठाकरे (प्रभारी) (दि.१९.०२.२०२० ते दि.२४.०२.२०२०) /**<br>**श्री. अरुण डोंगरे, भा.प्र.से. (दि.२४.०२.२०२० पासून)** | **सदस्य** |
| ०३ | **अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक**<br>**श्री. दिलीप स्वामी** | **सदस्य** |
| ०४ | **सहा. धर्मादाय आयुक्त, अहमदनगर**<br>**श्रीमती गीता प्रविण बनकर** | **सदस्य** |

उपरोक्त मा.तदर्थ (Ad-hoc) समितीच्या अहवाल सालात **एकुण ०८ सभा** झालेल्या आहेत.

# विश्वस्तव्यवस्थेची कर्तव्ये व अधिकार

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम, २००४ मधील कलम १७(२) तसेच (सुधारीत) कलम २१ (१) व (२) अन्वये विश्वस्तनिधीच्या विनियोगासाठी विश्वस्तव्यवस्थेचे ध्येय, उद्देश व कार्याविषयी सविस्तरपणे विवेचन करण्यात आलेले आहे. या प्रमुख कर्तव्ये व अधिकाराबाबत थोडक्यात गोषवारा पुढील प्रमाणे :

(१) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन पाहणे. मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे. श्री साईबाबांचे शिकवणुकीचा प्रचार करणे, अन्नछत्र चालविणे, भक्तांचे निवासासाठी व उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे. या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

(२) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करण्याच्या व योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी, तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या स्थावर किंवा जंगम मालमत्ता संपादित करील किंवा खरेदी करील.

(३) श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण या बाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

(४) श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल.

(५) सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील तसेच, शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

(६) मानवजातीचे कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

(७) या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, समितीला अधिनियमाखाली आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

# प्रशासकीय कामकाज

## मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, अधिनियम २००४ मधील कलम १३ आणि सुधारणा अध्यादेश क्रमांक १२, दिनांक १३ जुलै, २०१७ अन्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे प्रशासन प्रमुख असलेल्या कार्यकारी अधिकारी या पदाचे नामाभिधान **मुख्य कार्यकारी अधिकारी** असे करणेत आले आहे.

त्यानुसार दिनांक ०८ मार्च, २०१७ रोजीचे मा.महाराष्ट्र शासनाचे आदेशानुसार, विश्वस्तव्यवस्थेचे दैनंदिन प्रशासनाचे कामकाज पाहणेसाठी **भारतीय प्रशासन सेवेतील** अधिका-याची प्रतिनियुक्तीने **मुख्य कार्यकारी अधिकारी** या पदावर नेमणूक करणेत येत आहे.

अहवाल सालात, मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर खाली नमूद केलेप्रमाणे मा.शासनाकडून प्रतिनियुक्तीने नेमणूक करणेत आलेल्या भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी यांनी संस्थानाचे दैनंदिन व्यवस्थापनाचे कामकाज पाहिले आहे / पाहत आहेत.

| अ.क्र. | नांव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. दीपक मधुकरराव मुगळीकर, भा.प्र.से. | मुख्य कार्यकारी अधिकारी | दि. २८/०३/२०१९ ते दि.१९/०२/२०२० अखेर |
| ०२ | श्री. रविंद्र चिंधू ठाकरे, उपजिल्हाधिकारी | प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी | दि.१९/०२/२०२० ते दि.२४/०२/२०२० अखेर |
| ०३ | श्री.अरुण किशोर डोंगरे, भा.प्र.से. | मुख्य कार्यकारी अधिकारी | दि.२४/०२/२०२० पासून |

## उपमुख्य कार्यकारी अधिकारी

संस्थानचे वाढते कामकाजाचे स्वरुप पाहता तत्कालीन कार्यकारी अधिकारी (सध्या मुख्य कार्यकारी अधिकारी) यांचे सहाय्यासाठी तसेच संस्थानाचे दैनंदिन कामकाजाचे व्यवस्थापनासाठी व नियंत्रणासाठी मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक १८ मार्च, २००९ रोजीचे आदेशान्वये निर्माण केलेले तहसिलदार संवर्गातील उपकार्यकारी अधिकारी हे पद, मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन

यांचेकडील दि.११ जानेवारी २०१९ रोजीचे आदेशान्वये, उपजिल्हाधिकारी या संवर्गात दर्जोन्नत करुन पदनाम उपमुख्य कार्यकारी अधिकारी करणेस मान्यता देण्यात आली.

अहवाल सालात, खाली नमूद केलेप्रमाणे मा.महाराष्ट्र शासनाकडून प्रतिनियुक्तीने नेमणूक करणेत आलेले अधिकारी यांनी **उप कार्यकारी अधिकारी / उपमुख्य कार्यकारी अधिकारी** म्हणून संस्थान व्यवस्थापनाचे कामकाज पाहिले आहे / पाहत आहेत.

| अ.क्र. | नांव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. रविंद्र चिंधू ठाकरे<br>उपजिल्हाधिकारी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी | दि.२७/०२/२०१९ ते<br>आजपावेतो |

### (अ) मा. महाराष्ट्र शासनामार्फत संस्थान आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने असणारे इतर अधिकारी

संस्थान आस्थापनेवरील सामान्य प्रशासन विभाग, लेखाशाखा व संरक्षण विभाग या महत्वाचे व संवेदनशील असणारे विभागाचे दैनंदिन कामकाजाचे प्रभावी नियोजन व नियंत्रण व्हावे म्हणून महाराष्ट्र शासनामार्फत खाली नमूद केलेल्या अधिका-यांची संस्थान आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेत आली आहे.

| अ.नं. | प्रतिनियुक्तीने नियुक्त करणेत आलेल्या अधिका-याचे नांव व शासकीय पदनाम/विभाग | संस्थान आस्थापनेवरील पदनाम व विभागाचे नांव | संस्थान सेवेत हजर झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. बाबासाहेब बाळकृष्ण घोरपडे<br>सहाय्यक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, महाराष्ट्र राज्य | मुख्य लेखाधिकारी,<br>लेखाशाखा | दि.११ जुलै, २०१६ ते<br>आजपावेतो |
| ०२ | श्री. मधुकर लक्ष्मण गंगावणे<br>पोलिस उपनिरिक्षक, गृह विभाग, महाराष्ट्र राज्य | संरक्षण अधिकारी,<br>संरक्षण विभाग | दि.०३ एप्रिल, २०१५ ते<br>दि.३१ मे २०२० |
| ०३ | डॉ. आकाश रामहरी किसवे<br>नायब तहसिलदार, महसुल व वन विभाग, महाराष्ट्र राज्य | प्रशासकीय अधिकारी,<br>सामान्य प्रशासन विभाग | दि.२५ सप्टेंबर, २०१८ ते<br>आजपावेतो |

# प्रशासनाची रचना

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्गदर्शन-तथा-नियंत्रणाखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, विभागप्रमुख व इतर कर्मचारी हे विश्वस्तव्यवस्थेचे दैनंदिन कार्यालयीन कामकाज सुरळीतरित्या पार पाडीत आहेत.

संस्थानचे दैनंदिन कामकाजाचे सुसूत्रीकरण व्हावे, यासाठी कामाचे स्वरुपानुसार व कामकाजात सरळता, सुलभता यावी या दृष्टीने व भक्तांच्या सोयी-सुविधेशी निगडीत कामांच्या दृष्टीने विविध विभागांची रचना करणेत आलेली असून सध्या खालीलप्रमाणे विभाग कार्यरत असून त्यांचेमार्फत खाली नमूद केलेप्रमाणे सेवा देण्यात येत आहेत.

## (अ) संस्थानचे दैनंदिन कामकाज पार पाडणेसाठी कार्यरत असणारे विभाग

| अ.नं. | विभागाचे नांव | कार्य / सेवा तपशील |
|---|---|---|
| ०१ | सामान्य प्रशासन शाखा | कार्यासन १ - आस्थापना - कर्मचारीविषयक सर्व प्रशासकीय कामे.<br>कार्यासन ५ - उत्सव व इतर सामाजिक, धार्मिक कार्यक्रम कामकाज<br>कार्यासन ६ - कर्मचारी पाल्य शैक्षणिक शुल्क परतावा<br>कार्यासन ८ - भक्तमंडळ सभासद विषयक कामकाज.<br>कार्यासन ९ - आवक पत्रव्यव्यवहार विषयक कामकाज<br>कार्यासन १०- (अ/ब/क) - कर्मचारी पगारबिले व त्यासंबंधीत इतर अनुषंगिक कामकाज.<br>कार्यासन ११- जावक पत्रव्यव्यवहार विषयक कामकाज<br>कार्यासन १२ - टंकलेखन / झेरॉक्स विभाग<br>कार्यासन (शिस्त) – कर्मचारी गैरवर्तनाबाबत कामकाज |
| ०२ | मागासवर्ग कक्ष | संस्थान आस्थापनेवरील अधिकारी-कर्मचारी यांची १०० बिंदू नामावली, कर्मचारी आरक्षणानुसार नेमणूका-पदोन्नती साखळी निश्चित करणे आदि कामकाज पाहणे. |
| ०३ | विधी विभाग (कार्यासन २) | संस्थान संबंधित सर्व प्रकारचे विधी व न्यायालयीन विषयक काम पाहणे. |
| ०४ | सभाकामकाज विभाग (कार्यासन ४) | मा.व्यवस्थापन समितीसह अधिनियमातील तरतूदीनुसार स्थापन करणेत आलेल्या विविध समित्या यांचे सभा कामकाज विषयक कामकाज पाहणे. |
| ०५ | कामगार विभाग (कार्यासन ७अ) | संस्थान आस्थापनेवर काम करणाऱ्या कर्मचारी रजा, सुट्ट्या, शिस्त, गैरवर्तन, दंड, खातेनिहाय चौकशी व न्यायालय विषयक काम पाहणे. |
| ०६ | जनसंपर्क विभाग ( कार्यासन १३) | साईभक्तांना श्रींचे दर्शन विनासायास व सुलभरितीने व्हावे म्हणून सोयी-सुविधा देणेकामी कामकाज, मान्यवरांच्या शिर्डी भेटीविषयक कामकाज, संस्थान विषयक माहिती व प्रसिध्दी विषयक काम पाहणे. |

| अ.नं. | विभागाचे नांव | कार्य / सेवा तपशील |
|---|---|---|
| ०७ | **लेखाशाखा** | |
| | अ) लेखाशाखे संबंधीत जमा-खर्च नोंदी घेणे, लेखापुस्तके ठेवणे. | संस्थानला दैनंदिन रोख रक्कमा, मनिऑर्डर, चेक/डी.डी., वस्तु रुपाने प्राप्त होणा-या देणग्या, विदेशी चलनाद्वारे प्राप्त होणा-या देणग्या, दक्षिणापेटया मोजणी, सोने, चांदी, कापड देणगी इ. देणगी व इतर उत्पन्न याच्या लेखापुस्तकांमध्ये नोंदी घेणे, संस्थानच्या बॅंक खात्यामध्ये जमा करणे, संपूर्ण संस्थानच्या विभागांकडून दैनंदिन खर्चाची आलेली देयके आदा करणे, त्यांची अचूकपणे तपासणी करणे व त्याच्या नोंदी लेखापुस्तकांमध्ये घेणे. लेखापुस्तके, रोख रक्कमा, सोने-चांदी वस्तू, सोने-चांदी नाणी, मौल्यवान खडे यांचे साठा रजिस्टर ठेवणे. साधारणतः रु.२२०० कोटी रुपयांच्या गुंतवणूका विहीत पद्धतीने बॅंकांमध्ये करणे. त्यावर प्राप्त होणारे व्याज, वजावट होणारा आयकर याचा अचूक हिशोब ठेवणे, मासिक जमा-खर्च तक्ते मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव नोंद घेण्याकरिता सादर करणे. |
| | ब) अंतर्गत लेखापरिक्षण कक्ष | संस्थान वैधानिक लेखापरिक्षक नियुक्ती, अंतर्गत लेखापरिक्षक नियुक्ती, पूर्व लेखापरिक्षक नियुक्ती संबंधीत, संस्थानच्या सर्व चल-अचल मालमत्ता, स्टॉक, रोख रक्कमा तपासणी अहवाल दप्तरी ठेवणे. लेखापरिक्षण कामकाजाकरिता लेखापुस्तके उपलब्ध करुन देणे, वैधानिक लेखापरिक्षण अहवाल मा.विधी व न्याय विभागास सादर करुन विधीमंडळाच्या पटलावर ठेवणे संबंधीत इ. |
| | क) आयकर, व्हॅट, सेवाकर, जीएसटी इ. करविषयक कामकाज कक्ष | कर सल्लागार, विधिज्ञ यांच्या विहीत पद्धतीने नेमणूका, आयकर, सेवाकर, व्हॅट, जीएसटी संबंधीत मासिक, त्रैमासिक, वार्षिक कामकाज, आयकर, जीएसटी मासिक वजावटी शासनाच्या कोषागारात भरणे. संस्थानचे वार्षिक आयकर विवरणपत्र दाखल करणे, करनिर्धारण, अपील व करविषयक न्यायालयीन कामकाज इ. |
| | ड) वार्षिक अंदाजपत्रक कक्ष (Annual Budget) | संस्थानमधील सर्व विभाग व उपविभागांचे वार्षिक अंदाजपत्रक व सुधारीत अंदाजपत्रक मांडणे. अंदाजपत्रकाची प्रत मा.धर्मादाय आयुक्त, मुंबई व मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करणे इ. |
| | इ) आर्थिक अनुदान कक्ष | अधिनियमातील तरतुदीनुसार आर्थिक अनुदान आदा करणे. |
| ०८ | मंदिर विभाग | श्रींची दैनंदिन पुजा-अर्चा (अभिषेक पूजा, श्री साई सत्यव्रत पूजा), श्री साईंच्या सर्व आरत्या, दर्शनास येणाऱ्या भक्तांना सुलभतेने दर्शन उपलब्ध होईल याची तजवीज करणे, श्रींचे रामनवमी, गुरुपौर्णिमा, पुण्यतिथी (दसरा) व इतर उत्सव साजरे करणे. |
| ०९ | प्रकाशने विभाग | श्रींचे संस्थान प्रकाशित वेगवेगळे फोटो, त्यांचे वेगवेगळया भाषेतील चरित्र, पोथी, दैनंदिनी,दिनदर्शिका यांचे छपाईचे संबंधीत सर्व कामे पाहणे व भक्तांना विक्री करीता उपलब्ध करणे. तसेच साईलिला मासिक छपाई व माहिती केंद्र विषयक कामे. |

| अ.नं. | विभागाचे नांव | कार्य / सेवा तपशील |
|---|---|---|
| १० | आरोग्य विभाग | मंदिर परिसर, निवासस्थाने इ. ठिकाणी स्वच्छता व इतर अनुषंगीक कामे करणे. |
| ११ | संरक्षण विभाग | मंदिर परिसर, निवासस्थाने, प्रसादालय व इतर ठिकाणी भक्तांचे व संस्थान मालमत्तेचे संरक्षण व्यवस्था व भक्तांची सुलभ दर्शन व्यवस्था करणे. |
| १२ | बांधकाम विभाग (शताब्दी कक्ष) | मंदिर, दर्शनलाईन, निवासस्थाने, उपहारगृहे, प्रसादालय, रुग्णालय, शैक्षणिक संकुल इत्यादी संस्थान इमारती व मालमत्तेची निगा, दुरुस्ती देखभाल, आवश्यक ती नविन बांधकामे करणे, विविध विकास प्रकल्पांसाठी जमिनींची खरेदी / भूसंपादन करणे, जमिनीविषयक बाबी हाताळणे. तसेच शताब्दी कक्षाकडून उत्सव काळात विविध प्रकारचे धार्मिक / सामाजिक / सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन कार्यक्रम पार पाडणे. |
| १३ | पाणी पुरवठा विभाग | मंदिर परिसर, रुग्णालये, निवासस्थाने, प्रसादालय व संस्थान सर्व कार्यालये व इतर ठिकाणी स्वच्छ व निर्जंतुक पाण्याचा पुरवठा करणे. |
| १४ | विद्युत विभाग | मंदिर परिसर, दर्शन रांगा, निवासस्थाने, प्रसादालय, रुग्णालये या सर्व ठिकाणी विद्युत पुरवठा सुरळीत चालू ठेवणे, उत्सव व इतर कार्यक्रम प्रसंगी विद्युत रोषणाई करणे. |
| १५ | ध्वनीक्षेपण व टेलिफोन विभाग | मंदिरात होणाऱ्या दैनंदिन आरत्या, भजने व विविध कार्यक्रम यासाठी ध्वनीक्षेपण व्यवस्था करणे, कार्यक्रमांचे रेकॉर्डींग व प्रसारण करणे यासंबंधीत कामे करणे. |
| १६ | साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग | भक्तांना विनासायास व सुलभतेने माफक दरात निवासस्थाने सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून सदरहू स्वतंत्र ०५ निवासस्थाने विभाग हे २४ तास कार्यरत आहेत. या निवासस्थानांमधील निवासी खोल्या भक्तांना ऑनलाईनद्वारे तसेच समक्ष येणारे भक्तांना प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य तत्वावर उपलब्ध करुन दिल्या जातात. |
| १७ | साईप्रसाद निवासस्थान विभाग | |
| १८ | द्वारावती भक्तनिवासस्थान विभाग | |
| १९ | साईआश्रम भक्तनिवास | |
| २० | साई धर्मशाळा | |
| २१ | श्री साई प्रसादालय विभाग | भक्तांना सकाळी १० ते रात्रौ १० वाजेपर्यंत प्रसाद भोजनाची व्यवस्था करणे. |
| २२ | कॅन्टीन विभाग | भक्तांसाठी चहा, कॉफी, दुध व नाष्टा पाकीटे उपलब्ध करुन देणे, नाष्टा पाकीटे स.७ ते १० वाजेपर्यंत उपलब्ध करुन दिली जातात. |
| २३ | खरेदी विभाग | प्रसादालयात प्रसादभोजन व कॅन्टीन विभाग या विभागासाठी आवश्यक असणाऱ्या मालांची खरेदी तसेच संस्थानचे इतर कार्यालयास दुरुस्ती देखभालीसाठी लागणाऱ्या वस्तु व स्टेशनरी विषयक खरेदीचे कामे करणे. |
| २४ | भांडार विभाग | विविध कार्यालयासाठी कामाच्या दृष्टिने खरेदी केलेल्या मालाची नोंद / साठा घेऊन मागणी पत्रकानुसार विविध विभागांना माल पुरविणे. |
| २५ | वाहन विभाग | श्री साईबाबा भक्तनिवासस्थाने या ठिकाणाहून दर्शनासाठी मंदिर परिसरापर्यंत, प्रसाद भोजनासाठी श्री साईप्रसादालय विभागापर्यंत भक्तांची मोफत ने-आण करणे, नगरसूल व साईनगर शिर्डी रेल्वेस्टेशन येथून भक्तांची ने-आण करणे. रुग्णालयासाठी ॲम्बुलन्स, शैक्षणिक संकुलासाठी स्कुल बस व कार्यालयीन कामकाजासाठी वाहने पुरविणे, वाहनांची दुरुस्ती देखभाल करणे इ. |

| अ.नं. | विभागाचे नांव | कार्य / सेवा तपशील |
|---|---|---|
| २६ | बगीचा विभाग | मंदिर व परिसरात फुलझाडे, वृक्ष तसेच श्रींचे हारासाठी लागणारी फुले यांचे संगोपन करणे, बगीचा विषयक कामे करणे, विविध उत्सवात व कार्यक्रमप्रसंगी फुलांची सजावट करणे. |
| २७ | अभिलेख कक्ष | संस्थानकडील जुन्या वस्तुंचा लिलाव करणे व संस्थानमधील अ,ब,क,ड प्रकारचे रेकॉर्ड ठेवणे व जतन करणे. |
| २८ | माहिती तंत्रज्ञान विभाग | सॉफ्टवेअर, हार्डवेअर डेव्हलपमेंट, मेंन्टेनन्स व नेटवर्कींग, वेबसाईट डेव्हलपमेंट बाबतची सर्व कामे, संस्थानविषयक माहितीबरोबरच श्री साईंचे जीवनावरील प्रकाशने वेबसाईटवर उपलब्ध करुन देणे. |
| २९ | मुंबई कार्यालय | दादर, मुंबई येथे विश्वस्तव्यवस्थेच्या स्व:मालकीचे "साईनिकेतन" इमारतीत सुरु आहे. साईलिला मासिक वितरण विषयक कामे, देणग्या स्विकारणे, मंत्रालया संबंधातील कामे करणे आदी. |
| ३० | लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग | साईभक्तांकरीता प्रसादरुपाने उपलब्ध करुन द्यावयाचे लाडू निर्मितीचे संपूर्ण प्रक्रियेवर एकसंघ नियंत्रण व देखरेख ठेवून, भक्तांना विनासायास व सुलभ रितीने लाडू प्रसाद / बुंदी प्रसाद उपलब्ध करुन देणे. |
| ३१ | सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेल | सलग सुट्टयांचे कालावधीत तसेच उत्सव काळात शिर्डी येथे साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होते. यावेळी समाधी मंदिरासह मंदिर व संस्थान परिसरात व दर्शनरांगेत शांतता व सुव्यवस्था रहावी, पाकीटमारी, चोरी इ. पासून भक्तांचे संरक्षण व्हावे यादृष्टीने साईभक्तांचे गर्दीवर सी.सी.टी.व्ही. यंत्रणेच्या सहाय्याने नियंत्रण ठेवणेकामी स्वतंत्र कक्षाची स्थापना करणेत आलेली आहे. तसेच संस्थान आयोजित कार्यक्रमाची छायाचित्रे काढणे. |
| ३२ | मालमत्ता विभाग | संस्थान मालकीचे जंगम व स्थावर मालमत्तेचे जतन व संरक्षण करणे, जमीनीविषयक बाबी हाताळणे, संस्थान व्यवस्थापनासाठी विकास कामांचे दृष्टीने आवश्यक जमिनीचे संपादन करणे, जमीन महसूल विषयक बाबींमध्ये सुसूत्रीकरण करुन जमीन महसुल विषयक कामे पहाणे. |
| ३३ | फायर ॲण्ड सेफ्टी विभाग | संस्थानचे सर्व इमारतींचे आगीपासून संरक्षण होणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना / कामे सदर विभागाकडून करण्यात येतात. फायर सिलेंडर दुरुस्ती देखभाल, सर्व इमारतींचे फायर ऑडीट करणे तसेच संस्थान गॅस प्लांटवर प्रशिक्षित कर्मचा-यांमार्फत देखरेख करणे. या विभागाकडे ०४ अग्निशामक वाहने असून सदर वाहनांवर प्रशिक्षित कर्मचा-यांची नेमणूक केलेली आहे. |
| ३४ | मेकॅनिकल विभाग | विविध विभागांकडे असलेले वातानुकूलिन यंत्रे, प्रसादालयाकडील यंत्रसामुग्री, गॅस प्लांट व इतर यंत्रसामुग्रीचे देखभाल-दुरुस्तीसह इतर अनुषंगिक कामकाज पहाणे. |

**(ब) संस्थान संचलित इतर उपक्रमांतर्गत शैक्षणिक संकुल**

| अ.नं. | विभागाचे नांव | कार्य / सेवा तपशील |
|---|---|---|
| ३५ | श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी. | औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये विद्यार्थी - विद्यार्थिनींना विविध प्रकारचे व्यवसाय आधारित १२ तांत्रिक अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाते. |
| ३६ | श्री साईबाबा इंग्लिश मिडीअम स्कुल, शिर्डी. | इंग्लिश मिडीअम स्कुलमध्ये विद्यार्थी - विद्यार्थिनींना ज्युनिअर के.जी. ते इयत्ता १० वी पर्यंत इंग्रजी माध्यमातून शिक्षण दिले जाते. |
| ३७ | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी | कन्या विद्या मंदिर मध्ये इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत विद्यार्थिनींना मोफत शिक्षण दिले जाते. |
| | | कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विद्यार्थी - विद्यार्थिनींना कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे शिक्षण दिले जाते. |
| ३८ | श्री साईबाबा (वरिष्ठ) महाविद्यालय, शिर्डी | महाविद्यालयामध्ये विद्यार्थी – विद्यार्थींना कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे शिक्षण दिले जाते. |

**(क) संस्थान संचलित इतर उपक्रमांतर्गत रुग्णालये**

| अ.नं. | विभागाचे नांव | कार्य / सेवा तपशील |
|---|---|---|
| ३९ | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी (३०० खाटांचे) | आर्थिकदृष्टया दुर्बल रुग्णांबरोबरच उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना विनामुल्य अथवा माफक व अल्पदरात वैद्यकीय सेवा देणे, विहीत नियमाप्रमाणे आर्थिक वैद्यकीय अनुदान देणे आदि. |
| ४० | श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, शिर्डी. (२५९ खाटांचे) | माफक दरात वैद्यकीय सेवा देणे, आर्थिकदृष्टया दुर्बल गरजू रुग्णांना विनामुल्य वैद्यकीय सेवा देणे, विहीत नियमानुसार शासकीय आर्थिक सवलत योजनांचा रुग्णांना लाभ देणे. |

मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत संस्थान कर्मचाऱ्यांचा विभागवार व वेतनश्रेणीनिहाय **४८२६ पदांचा** सर्वसमावेशक आकृतीबंध मंजूर असून, या आकृतीबंधानुसार, संस्थानची पदनिहाय व वेतनश्रेणीनिहाय **स्थायी कर्मचारी संख्या २९०८** व **कंत्राटी कर्मचारी संख्या १९१८** मंजूर करण्यात आलेली आहे

अहवाल सालात, विश्वस्तव्यवस्थेच्या आस्थापनेवर, **दिनांक ३१ मार्च, २०२०** अखेर मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर पदांवर मा.महाराष्ट्र शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या ०५ अधिकाऱ्यांसह, संस्थान सेवेतील प्रशासकीय अधिकारी, विभागप्रमुख यांचेसह विविध श्रेणीतील **एकूण १९१३ स्थायी कर्मचारी** व संस्थान आस्थापनेवर नव्याने नेमणूक झालेले ५९८ कंत्राटी कर्मचारी आहेत.

याशिवाय, भक्तांच्या वाढत्या गर्दीमुळे त्यांना आवश्यक मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी ३१ मार्च २०२० अखेर दररोज कुशल व अकुशल असे सुमारे १९५१ कंत्राटी कर्मचारी हे ठेकेदरामार्फत काम करीत आहेत. या कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन दिले जात आहे. तसेच सुरक्षेसाठी सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक कंत्राटी सुरक्षा कर्मचारी मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले जात आहे.

# संस्थान कर्मचा-यांना देणेत येणा-या सोयी-सुविधा

संस्थान आस्थापनेवरील सर्व स्थायी कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे वेतन व इतर सुविधा देणेत येतात :

*** महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन व भत्ते.**

*** दीपावली सानुग्रह अनुदान.**

*** गृहकर्जावरील व्याजावर ५० टक्के सवलत.**

*** पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा.**

*** कामगार नुकसान भरपाई कायद्यांतर्गत समूह विमा.**

*** मोफत वैद्यकीय सेवा.**

*** ग्रुप ग्रॅच्युईटी.**

*** अद्ययावत निवासस्थाने.**

# भक्तमंडळ

मा. दिवाणी न्यायालय, अहमदनगर यांनी श्री साईबाबा संस्थान, शिर्डीचे व्यवस्थापनासाठी तयार केलेल्या व मान्य केलेल्या योजनेनुसार व आताचे अधिनियमातील तरतुदीनुसार श्री साईभक्तांचे भक्तमंडळ अस्तित्वात असून, या भक्तमंडळ सभासदत्वाचे **आश्रयदाते, आजीव व सर्वसाधारण (वार्षिक) सभासद** असे **तीन** प्रकार उपलब्ध आहेत.

भक्तमंडळाचे सर्व सभासदांना संस्थानमार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या तीनही उत्सवाची निमंत्रणपत्रिका व उदीप्रसाद पोष्टाने पाठविला जात आहे.

मा. महाराष्ट्र शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम - २००४ मध्ये नमुद केलेप्रमाणे, संस्थान व्यवस्थापनाने **दिनांक ०१ जानेवारी, २०१५ पासून** भक्तमंडळ सभासदात्वाबाबत नव्याने नियमावली अंमलात आणलेली आहे. या नियमावलीनुसार खाली नमुद केलेल्या सभासदांचे प्रकारानुसार सभासद शुल्कात वाढ करणेत आलेली आहे. अहवाल वर्षअखेर दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी अखेर भक्तमंडळाची सभासदांची संख्या खालीलप्रमाणे आहे :-

| अ. नं. | सभासद प्रकार | सभासद शुल्क | दि. ३१ मार्च, २०१९ अखेर सभासद | अहवाल सालात नवीन झालेले सभासद | कमी झालेले सभासद | दि. ३१ मार्च, २०२० अखेर सभासद |
|---|---|---|---|---|---|---|
| **(अ) दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ पर्यंत** | | | | | | |
| ०१ | आश्रयदाते सभासद | रुपये १,५००/- (एकाच वेळेस) हयात असेपर्यंत | ३७,२४९ | -- | ७२ | **३७,१७७** |
| ०२ | आजीव सभासद | रुपये २५१/- (एकाच वेळेस) हयात असेपर्यंत | १,६९,७७८ | -- | १,२३४ | **१,६८,५४४** |
| | | **एकुण (अ) -** | **२,०७,०२७** | **--** | **१,३०६** | **२,०५,७२१** |
| **(ब) दिनांक ०१ एप्रिल, २०१९ ते दिनांक ३१ मार्च २०२० अखेर** | | | | | | |
| ०१ | आश्रयदाते सभासद | रुपये ५,००,०००/- (२० वर्षाचे कालावधीसाठी) | ०९ | ०२ | -- | **११** |
| ०२ | आजीव सभासद | रुपये ५०,०००/- (१५ वर्षाचे कालावधीसाठी) | ७९६ | २३७ | -- | **१,०३३** |
| ०३ | सर्वसाधारण सभासद | रुपये ३,०००/- (१ वर्षाचे कालावधीसाठी) | २७६ | ३९२ | २७५ | **३९३** |
| | | **एकुण (ब) -** | **१,०८१** | **६३१** | **२७५** | **१,४३७** |
| | | **भक्तमंडळाची एकूण सभासद संख्या (अ+ब) -** | - | - | - | **२,०७,१५८** |

दि.३१ मार्च २०२० अखेर भक्तमंडळाची एकुण **सभासद संख्या - २,०७,१५८** इतकी आहे.

# विश्वस्तव्यवस्थेमार्फत देणेत येणाऱ्या सेवा-सुविधा

श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देणाऱ्या साईभक्तांना विविध प्रकारच्या सेवा-सुविधा पुरविण्यात येतात. त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे :-

## निवासस्थान सुविधा

विश्वस्तव्यवस्थेकडून साईभक्तांच्या सोयीसाठी सर्व मुलभूत सेवा २४ तास उपलब्ध केलेल्या आहेत. या सेवेत अत्यंत महत्वाच्या अशा निवासव्यवस्थेसाठी विविध प्रकारची अद्ययावत सोयींनीयुक्त परिपूर्ण निवासस्थाने सर्व स्तरातील साईभक्तांना त्यांच्या आर्थिक क्षमतेनुसार उपलब्ध आहेत. तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी वातानुकूलीत कक्ष तयार करण्यात आलेले आहेत. सध्या विश्वस्तव्यवस्थेकडे उपलब्ध असलेली निवासस्थाने, त्यांचे प्रकार, खोल्यांची संख्या, सेवाआकार आदि माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | निवास संकुलाची नांवे | प्रकार | एकूण खोल्या | सेवा आकार / प्रति दिवस |
|---|---|---|---|---|
| **(अ) साईप्रसाद निवासस्थान विभाग – २,१२,१४५ भक्तांनी निवासव्यवस्थेचा लाभ घेतला.** | | | | |
| ०१ | श्री साईनिवास अतिथीगृह | वातानुकूलीत सूट | २४ | रु.८००/- |
| ०२ | साईउद्यान इमारत (नॉन ए.सी. रुम) | हॉल | १२ | रु.४००/- |
| | | मध्यम खोल्या | २० | रु.१००/- |
| | | लहान खोल्या | १६ | रु.५०/- |
| | | लॉकर्स | ९९ | रु.१०/- प्रत्येकी |
| ०३ | साईनाथ छाया इमारत (नॉन ए.सी.) | हॉल (प्रति व्यक्ति रु.२५/- अशा ४० व्यक्तिंकरिता) | ०१ | रु.१०००/- |
| ०४ | शांतीनिकेतन इमारत (नॉन ए.सी.) | मध्यम खोल्या | १५ | रु.२००/- व रु.३००/- |
| ०५ | सेवाधाम इमारत (नॉन ए.सी.) | साध्या खोल्या | ६० | रु.५०/- |
| ०६ | शिर्डी बसस्थानक (नॉन ए.सी.) | खोल्या | १४ | रु.३००/- व रु.५००/- |
| | | हॉल | ०४ | रु.६००/- |

| (ब) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग – ९,६०,१४३ भक्तांनी निवासव्यवस्थेचा लाभ घेतला. | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.नं.** | **निवास संकुलाची नांवे** | **प्रकार** | **एकूण खोल्या** | **सेवा आकार /प्रति दिवस** |
| ०७ | साईबाबा भक्तनिवासस्थान | वातानुकूलीत खोल्या | ८ | रु.५५०/- |
| | | वातानुकूलीत खोल्या | २ | रु.९००/- |
| | | खोल्या (०४ कॉटस्) | १८ | रु.१५०/- |
| | | खोल्या (०३ कॉटस्) | २२४ | रु.१२५/- |
| | | खोल्या (०५ कॉटस्) | १ | रु.५००/- |
| | | खोल्या (०६ कॉटस्) | १ | रु.६००/- |
| | | खोल्या (०७ कॉटस्) | १ | रु.२००/- |
| | | खोल्या (११ कॉटस्) | २० | रु.४५०/- |
| | | खोल्या (१२ कॉटस्) | २ | रु.५००/- |
| | | कॉट विरहीत खोल्या | ३२ | रु.१००/- |
| | | हॉल्स (४० व्यक्ती) | २ | रु.५००/- |
| | | लॉकर्स | १९८ | प्रती व्यक्ती रु.१०/- |
| | | स्टोअर्स | १ | गाद्या व इतर साहित्य ठेवणेसाठी |
| | | इतर | २ | सुरक्षारक्षक, पोलिस व इतर यांना वास्तव्यासाठी |
| | | दुकान गाळे | ३१ | कार्यालयीन वापरासाठी |
| **(क) व्दारावती भक्तनिवास विभाग – ६,४०,६०७ भक्तांनी निवासव्यवस्थेचा लाभ घेतला.** | | | | |
| ०८ | व्दारावती भक्तनिवासस्थान | वातानुकूलीत खोल्या | ८० | रु.९००/- (०३ व्यक्तींकरीता) |
| | | साध्या खोल्या | २३६ | रु.५००/- (०३ व्यक्तींकरीता) |
| **(ड) साईआश्रम भक्तनिवासस्थान विभाग – २६,१७,५४५ भक्तांनी लाभ घेतला.** | | | | |
| ०९ | साईआश्रम भक्तनिवासस्थान एकुण १२ इमारती | वातानुकूलीत खोल्या | ३८४ | रु.५००/- (०३ व्यक्तींकरीता) |
| | | मध्यम खोल्या | ११५२ | रु.२००/- (०३ व्यक्तींकरीता) |
| **(इ) साई धर्मशाळा विभाग – ६,३२,३५६ साईभक्तांनी निवासव्यवस्थेचा लाभ घेतला.** | | | | |
| १० | साई धर्मशाळा | हॉल्स | १२८ | साईभक्तांना प्रति व्यक्ती रु.२०/- या प्रमाणे हॉल्स तात्पुरत्या निवासासाठी उपलब्ध करुन देणेत येत आहे. अपंग व्यक्तींना विनामुल्य निवासाची व्यवस्था उपलब्ध करुन देणेत येत आहे. |

साई धर्मशाळा विभागाकडील एकुण ०६ इमारतींपैकी ०२ इमारती (६४ हॉल्स) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

साईभक्तांना विनासायास निवासव्यवस्था उपलब्ध व्हावी या हेतूने भक्तांना एका वेळेस जास्तीत जास्त ०२ दिवस राहण्यासाठी परवानगी दिली जाते. तसेच आवश्यकतेप्रमाणे अल्प दरात जादा गाद्या, चादरी उपलब्ध करुन दिल्या जातात. या सर्व निवासस्थानांमधून २४ तास पाणी व विद्युत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

## सुलभ शौचालय व प्रसाधनगृह

जे साईभक्त मुक्कामी न थांबता, दर्शन घेऊन लगेचच परतणार आहेत, अशा भक्तांना प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सुलभ इंटरनॅशनल या सेवाभावी संस्थेने संस्थानच्या अर्थसहाय्यातून १२० प्रसाधनगृहे व १२० शौचालयाची सोय असलेली दोन मजली सुलभ शौचालयाची इमारत बांधलेली असून, सुलभ इंटरनॅशनलमार्फत सदर ठिकाणी दैनंदिन व्यवस्थापन केले जाते.

## प्रसाद लाडू सुविधा

श्री साईबाबांचा प्रसाद म्हणून साईभक्तांना प्रत्येकी सुमारे ५० ग्रॅम वजनाचे ०३ मोतीचूर लाडूंचे पाकिट रु.२५/- या देणगी मुल्य दरामध्ये उपलब्ध करुन देण्यात येते. मोतीचूर लाडू शुध्द तूपात काजू, बेदाणे, वेलची आदि सुकामेव्यांसह बनविले जात असल्याने ते अत्यंत चविष्ट असतात. भक्तांना लाडू प्रसाद सोबत घेऊन जाणे सोयीचे व्हावे यासाठी हे लाडू चांगले सुकवून पेपर पिशवीत पॅक केले जातात. यामुळे प्रसाद लाडूंना साईभक्तांकडून मोठया प्रमाणावर मागणी असते. प्रतिदिनी सरासरी २५ ते ३० हजार लाडू पाकिटांची मागणी होत असल्याने, साईभक्तांना ते सहजतेने उपलब्ध व्हावेत म्हणून एका स्वतंत्र कंत्राटदारांमार्फत प्रसाद लाडू तयार करुन घेणेत येत आहेत.

याकामी लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग हा स्वतंत्ररित्या कार्यान्वीत करणेत आलेला असून, लाडू व बुंदी प्रसाद पाकिटांचे विहित पद्धतीने वितरण केले जात आहे. श्री साईभक्तांना श्रीं चे दर्शन झालेनंतर प्रत्येकी ५० ग्रॅम बुंदी प्रसाद पाकिट प्रसादरुपाने वाटप करणेत येत आहे. याकामी दैनंदिन सरासरी ४० ते ४५ हजार बुंदी पाकीटे पुरविण्यात येतात.

## अल्पोपहार सुविधा

संस्थान परिसरातील तसेच दर्शन रांगेतील भक्तांना उपहारगृहाद्वारे (कॅन्टीन) २४ तास चहा, कॉफी, दूध, बिस्किटे व मिनरल वॉटर सुविधा पुरविली जाते. तसेच सकाळी ०७ ते १० यावेळेत नाष्टा पाकिटे ठेकेदारांकडून तयार करुन घेऊन साईभक्तांना उपलब्ध केली जातात. उपहारगृहामार्फत उपलब्ध करुन देणेत येणारे सर्व पदार्थ सवलतीच्या व वाजवी दरामध्ये भक्तांसाठी उपलब्ध आहेत. नाष्टा पाकिटाच्या एका पाकिटात पु-या, सुकी भाजी, मिष्टान्न असे पदार्थ उपलब्ध करुन दिले जातात. उपहारगृहात पार्ले, ब्रिटानिया, सनफिस्ट आदि कंपन्यांची बिस्किटे कंपनी दरात उपलब्ध करुन दिली जातात.

अहवाल सालात, गेल्या वर्षाचे तुलनेत उपहारगृह विभागामार्फत भक्तांना संस्थान परिसरात विविध ठिकाणी उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या सोयीमुळे, प्रसाद लाडू, चहा, कॉफी, दूध इ. सुविधा भक्तांना विनासायास उपलब्ध झालेली आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे :-

| अ. नं. | तपशील / दर | सन २०१७-१८ एकुण विक्री / वाटप नग | सन २०१८-१९ एकुण विक्री / वाटप नग | सन २०१९-२० एकुण विक्री / वाटप नग |
|---|---|---|---|---|
| ०१ | **प्रसाद लाडू** (०३ नग लाडू पाकिट - रु.२५/- प्रति पाकिट) | १,०५,५२,०१७ | १,१४,५०,९३३ | **१,२०,६०,६५२** |
| ०२ | **अन्न पाकिटे** ( रु.५/- प्रति पाकिट) | ३६,२१,९८१ | ३६,३७,०४० | **३६,३२,६२४** |
| ०३ | **चहा** ( रु.२/- प्रति कप ) | १,०९,११,९३२ | १,०६,०७,२३२ | **९१,६२,७८८** |
| ०४ | **कॉफी** ( रु.३/- प्रति कप ) | २३,५२,६६९ | २२,०२,७२३ | **१७,१०,१२८** |
| ०५ | **दूध** ( रु.३/- प्रति कप ) | १९,७३,३८० | १८,३२,८२६ | **१४,७१,५६८** |

मा.व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयानुसार **दिनांक ०४ सप्टेंबर २०१६** व **दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ पासून** दर्शन रांगेतील भक्तांना अनुक्रमे मोफत बुंदी प्रसाद वाटप तसेच चहा, कॉफी, दूध व बिस्किटे **विनामुल्य** (मोफत) वाटप करणेत येत आहे. याबाबत गतवर्षापासूनचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | तपशील | सन २०१७-१८ | सन २०१८-१९ | सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| ०१ | **चहा** | २७,८६,६१४ कप | १९,३८,३०५ कप | **१५,७५,८१५ कप** |
| ०२ | **कॉफी** | १२,५६,३७४ कप | ९,२१,४८३ कप | **७,४५,४३० कप** |
| ०३ | **दूध** | ३,८०,६७८ कप | २,९८,१६७ कप | **३,०६,४०४ कप** |
| ०४ | **बिस्किटस्** | १,२९,०७५ पुडे | १,५७,२६८ पुडे | **२,२३,९०८ पुडे** |
| ०५ | **मोफत बुंदी प्रसाद वाटप** (अंदाजे ५० ग्रॅम बुंदीचे पाकिट) | १,८६,४४,८१५ पाकीटे | २,०१,१७,८०० पाकीटे | **१,८६,६७,४३९ पाकीटे** |

या व्यतिरिक्त उपहारगृहामार्फत (कॅन्टीन) अहवाल सालात, संस्थानमार्फत आयोजित करणेत येणा-या वैद्यकिय शिबीरे, प्रथमोपचार केंद्रे, विद्यार्थी-पालक मेळावे व इतर धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांसाठी चहा, कॉफी, दूध आदींची विनामुल्य व्यवस्था करण्यात आलेली आहे.

## प्रसादालय भोजन सुविधा

**(माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये ISO-२२०००-२००५ मानांकन प्राप्त सुविधा)**

श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देणाऱ्या साईभक्तांना प्रसाद भोजनाची सुविधा विनासायास, विनाविलंब प्राप्त व्हावी या दृष्टीने, श्री साईप्रसादालयाचे तळमजला व पहिल्या मजल्यावरील भोजनकक्ष मिळून एकाच वेळेस ५५०० भक्त प्रसाद भोजन घेऊ शकतील अशा क्षमतेची **" श्री साई प्रसादालय "** ही सर्व सोयी-सुविधांयुक्त अद्ययावत इमारत भक्तांच्या सोयीसाठी दिनांक ०९ जानेवारी, २००९ पासून उपलब्ध करुन देण्यात आली आहे. प्रसाद भोजन जलद व चवदार बनविणेसाठी खालील देशी-विदेशी बनावटीच्या यंत्रणा व मशिनरीचा उपयोग करुन घेणेत येत आहे :

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | चपाती मशिन्स | ०२. | आटा मळणी यंत्र |
| ०३. | डिश वॉशिंग मशिन | ०४. | मसाला ग्राईंडर |
| ०५. | व्हेजिटेबल / राईस वॉशर | ०६. | व्हेजीटेबल प्रोसेसर मशिन |
| ०७. | ओनियन पिलर मशिन | ०८. | गार्लिक पिलर मशिन |
| ०९. | बटर मिक्सर | १०. | ऑनलाईन चक्की युनिट |
| ११. | स्टीम बॉयलर | १२. | सोलर स्टीम कुकींग सिस्टिम |
| १३. | थर्मिक फ्लुईड हिटींग यंत्रणा | १४. | आर. ओ. प्लँन्ट |
| १५. | माऊंटेड एल. पी. गॅस प्लॅन्ट | १६. | भाजीपाला व ड्रायफ्रुट कोल्ड स्टोअरेज |
| १७. | फायर हायड्रन्ट यंत्रणा | १८. | हायड्रोलिक ट्रॉलीज् |

प्रसाद भोजन बनविणेसाठी वर नमुद केलेल्या मशिनरींचा वापर केल्याने, मानवी श्रमांत बचत तर झालीच आहे, त्याबरोबर कमी वेळेत भक्तांना स्वच्छ व स्वादिष्ट प्रसाद भोजन उपलब्ध होत आहे. सध्या दररोज सकाळी १० वाजेपासून ते रात्रौ १० वाजेपर्यंत असे अविरत १२ तास विनामुल्य प्रसादभोजन उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

भक्तांना प्रसाद भोजनात भात, वरण, चपाती, दोन भाज्या व मिष्टान्न असे पदार्थ देण्यात येतात. प्रसाद भोजनातील चपात्या कंत्राटदाराकडून व चपाती मशिन्सचाही वापर करुन बनविण्यात येतात. प्रसादालयासाठी आवश्यक असणारा ताजा भाजीपाला ई-निविदा पध्दतीने खरेदी करुन आणला जातो. या व्यतिरीक्त संस्थानच्या शेतीमधून उपलब्ध होणारा ताजा भाजीपाला देखील वापरला जातो. प्रसादालयासाठी आवश्यक किराणामाल, कडधान्य, मसाला वगैरे माल खरेदी विभागामार्फत स्वतंत्रपणे निविदा मागणी करुन, वार्षिक दर निश्चित करुन खरेदी करणेत येतो. प्रतिदिनी साधारणपणे ४५ हजारापर्यंत साईभक्त प्रसादालयामध्ये प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. उत्सव व गर्दीच्या काळात ही संख्या प्रतीदिन साधारणपणे ९० हजारापर्यन्त जाते. गेल्या तीन वर्षात प्रसाद भोजन घेणाऱ्या भक्तांची संख्या दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | वर्ष | वर्षभरात प्रसादभोजन घेणाऱ्या भक्तांची संख्या | प्रतिदिन प्रसादभोजन घेणाऱ्या भक्तांची सरासरी संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | माहे एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ | १,५०,९७,२०१ | ४१,३६२ |
| ०२ | माहे एप्रिल, २०१८ ते मार्च, २०१९ | १,६१,०२,२६७ | ४४,११६ |
| **०३** | **माहे एप्रिल, २०१९ ते मार्च, २०२०** | **१,६४,२०,४५६** | **४४,९८८** |

प्रसादालयात अन्नपदार्थ तयार करणेसाठी खरेदी केलेला किराणा माल व अनुषंगिक साहित्य, अन्न व औषध प्रशासनाच्या मानकाप्रमाणे तपासणीकामी स्वतंत्र प्रयोगशाळा उभारणी करणेत आलेली असून, सदरची प्रयोगशाळा कार्यान्वीत करणेत आलेली आहे.

## अन्नदान सुविधा

जो भक्त शिर्डीत येईल तो कधीही भुकेला किंवा उपाशी राहू नये यासाठी श्री साईबाबा स्वतःच्या हातांनी व्दारकामाईमध्ये भोजन तयार करीत व गरीब, भुकेल्या भक्तांना जेऊ घालीत असत. ही शिकवण लक्षात ठेवून, परिसरातील मुकबधीर, अंध, अपंग शाळेतील विद्यार्थ्यांना, वृध्दाश्रमातील वृध्द आदिंना विनामुल्य प्रतिदिन अन्नदान करणेत येत आहे.

**दिनांक ०१ जानेवारी, २०१७ पासून प्रसादालयातील अन्नदान (प्रसाद भोजन) सुविधा सर्व भक्तांसाठी विनामुल्य (मोफत) सुरु करणेत आलेली आहे.**

# इतर विभागांच्या सेवा

## जनसंपर्क विभाग

या विभागामार्फत श्री क्षेत्र शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांना दर्शन, निवास, प्रसादभोजन आदि सुविधांच्या उपलब्धतेबाबत मार्गदर्शन करणे, सहाय्य करणे, श्री साईंच्या जीवनकार्याविषयी, संस्थानमार्फत साजरे करणेत येणारे उत्सव, विविध कार्यक्रम-उपक्रम आदिंची वृत्तपत्रातून प्रसिध्दी करणे, संस्थान व्यवस्थापनाच्या निर्णयानुसार वृत्तपत्रांतून जाहिराती प्रसिध्द करणे इत्यादी कामे केली जातात.

## लेखाशाखा

या विभागामार्फत आर्थिक प्रशासनाचे काम पार पाडले जाते. यामध्ये प्रामुख्याने लेख्यांमधील नोंदी, दक्षिणा पेटीतील रोख रक्कम व इतर मौल्यवान वस्तूंची मोजणी, देणगी कार्यालयांचे नियोजन, उपलब्ध होणाऱ्या निधींची गुंतवणूक, विविध देयकांच्या रक्कमांची अदायगी, प्रसाद रुपाने भक्तांना खरेदी करणेकामी कापड, वस्तू, सोने-चांदीचे पेंडंटस् - नाणी उपलब्ध करुन देणे, संस्थानच्या चल-अचल मालमत्तेचा, सोने-चांदी वस्तूंचा, कर्मचाऱ्यांचा विमा उतरविणे, लेख्यांचे नियमीत लेखापरिक्षण करुन घेणे आदि कामे पार पाडली जातात. संस्थानमधील सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण रहावे, त्याची वेळीच तपासणी व्हावी यासाठी पूर्वलेखापरीक्षक आणि अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. देश-विदेशातील साईभक्तांना घरबसल्या संस्थानला देणगी देता यावी म्हणून नेटबँकिंग व पेमेंट गेट-वेव्दारे ऑनलाईन देणगी सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. नेटबँकिंग सुविधेअंतर्गत स्टेट बँक ऑफ इंडिया, युनियन बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, एचडीएफसी बँक, सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया  या बँकांच्या सेवा तर पेमेंट गेट-वे अंतर्गत डेबिट / क्रेडिट कार्डव्दारे देणगी स्वीकारणेसाठी एचडीएफसी बँक या बँकेच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या ऑनलाईन देणगी सुविधा संस्थानच्या www.sai.org.in व www.online.sai.org.in या अधिकृत संकेतस्थळावर (वेबसाईटवर) तसेच उपरोक्त बँकांच्या संकेतस्थळांवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

या व्यतिरिक्त, भक्तांना देणगी देणेसाठी स्वत: सोबत मोठी रोख रक्कम बाळगण्याची व त्यासाठी जोखीम उठविणेची आता गरज नाही. कारण भक्तांना द्यावयाचे सेवेसंबंधीत आर्थिक व्यवहारासाठी सर्व विभागांचे कार्यालयांमध्ये POS / EDC मशीनव्दारे सर्व बँकांचे डेबिट / क्रेडिट कार्डव्दारे देणगी स्वीकारणेची तसेच इतर आर्थिक व्यवहार करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणेत आली आहे.

तसेच आठवडयातून साधारणत: दोन वेळेस तसेच भक्तांच्या गर्दीनुसार आवश्यक वेळी दक्षिणा पेटीतील दानाची मोजणी करण्यात येते. या कामी मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांचे प्रतिनिधी, राष्ट्रीयीकृत बँकेचे प्रतिनिधी, संस्थानने नेमलेले त्रयस्थ सोने-चांदीचे मुल्यांकनकार, संस्थानचे अधिकारी यांचेसह संस्थानचे

अंदाजे २२५ ते २५० कर्मचारी उपस्थित असतात. यामुळे दक्षिणा पेटी मोजणीमध्ये अधिकाधिक गतीमानता, पारदर्शकता व विश्वासार्हता निर्माण झाली आहे.

**संरक्षण विभाग**

साईभक्तांना संस्थान परिसरात सरुक्षितपणे वावरता यावे, रांगेमध्ये व गर्दीच्या ठिकाणी शिस्त रहावी आदी सर्व दक्षता संरक्षण विभागाकडून घेणेत येते. सध्या संरक्षण विभागाचे प्रमुख म्हणून महाराष्ट्र शासनाकडून प्रतिनियुक्तीवर पोलिस उपनिरीक्षक या संवर्गातील अधिका-याची नेमणुक करण्यात येते. सध्या संरक्षण विभागात संस्थानचे **१२७ स्थायी सुरक्षा** कर्मचारी, १४५ संस्थान कायम कंत्राटी कर्मचारी व खाजगी ठेकेदारांमार्फत सुमारे **७०६ कंत्राटी सुरक्षा रक्षक** (बंदूकधारी सुरक्षारक्षकांसह) सुरक्षा व्यवस्थेसाठी नेमण्यात आलेले आहेत.

याशिवाय सुरक्षेसाठी स्वतंत्र अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यात आली असून याकामी स्वतंत्र सीसीटीव्ही कंट्रोल सेल कक्ष कार्यरत करणेत आलेला आहे. कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये याकरिता परिसरातील सुरक्षेसाठी १५ डीएफएमडी, ०४ बॅगेज स्कॅनर, ७५ वॉकीटॉकी, ४० हॅन्ड मेटल डिटेक्टर, ०७ बुलेटप्रुफ पिकेटस् इ. साहित्यासह इतर संगणकीय साहित्य बसविणेत आलेले आहे. तसेच आवश्यक तेथे सशस्त्र पहारेकऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. संरक्षण विभागामार्फत शिर्डी शहर व परिसरातील नागरीकांसाठी, संस्थान कर्मचारी यांचेसाठी नाममात्र शुल्क आकारुन विविध उपकरणांनी सुसज्ज अशी व्यायामशाळा चालविणेत येत आहे.

देशातील विविध धार्मिक स्थळांमध्ये अतिरेक्यांकडून बॉम्बस्फोट घडवून आणून दहशत निर्माण केली जात आहे. त्यासाठी गृहविभाग, पोलिस खाते इत्यादींचे मार्गदर्शनाने व्यापक अत्याधुनिक संरक्षण व्यवस्था कार्यान्वीत करणेत आली आहे. या सुरक्षा व्यवस्थेचे दररोजचे नियंत्रण व परिक्षण करणेसाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष (कंट्रोल रुम) कार्यान्वीत करणेत आलेले आहे.

भक्तांच्या सुरक्षिततेसाठी गेट नं.४ चे आतील बाजूस मंदिर पोलिस चौकी कार्यरत आहे. शासनाकडून उपलब्ध झालेले पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता कार्यालय उपलब्ध करुन देणेत आलेले आहे. तसेच ज्या साईभक्तांचे पैसे हरवले, चोरीला गेले अशा भक्तांना संरक्षण विभागामार्फत विहीत पद्धतीने **भक्त मदत फंडातून** भक्ताचे स्वस्थळी पोहचण्यासाठी प्रवास भाडे देण्याची तरतूद करण्यात आली आहे. अहमदनगर - मनमाड राज्यमार्गावर खाजगी वाहने थांबून भक्तांच्या वाहतुकीस अडथळा निर्माण होतो म्हणून एक क्रेन व एक ४०७ ट्रक टेम्पो शिर्डी पोलिस स्टेशन यांना उपलब्ध करुन देणेत आलेले आहे.

**अग्नीशमन विभाग (फायर अॅण्ड सेफ्टी)**

मंजूर आकृतीबंधानुसार, अग्नीशमन (फायर अॅण्ड सेफ्टी) विभाग सुरु करणेत आलेला असून, या विभागामार्फत संस्थान आस्थापनेवरील कायम व कंत्राटी कर्मचा-यांमधून निवडक कर्मचा-यांची निवड करुन त्यांना राज्य अग्नीशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई येथे प्रशिक्षण देणेत आले आहे. गर्दीचे नियोजनासाठी १२ कंत्राटी कर्मचारी यांचे कायमस्वरुपी तसेच उत्सव कालावधीत ३६ कर्मचारी यांचे दक्षता पथकाची नेमणूक करण्यात येते.

१४१५ फायर सिलेंडरची वार्षिक रिफीलिंग करण्यात येते. याशिवाय मॉक ड्रील, फायर ड्रील तसेच वॉटर हायड्रंट यंत्रणांचे प्रात्यक्षिक संस्थान कर्मचा-यांना वेळोवेळी देण्यात येतात. तसेच अग्नीशमन विभाग व्यवस्थितरित्या कार्यरत असून विभागाकडे एकुण ४३ कर्मचा-यांसह ०१ वॉटर बाऊझर, ०१ फोम टेंडर, ०१ मिनी टेंडर व ०१ फायर बाईक अशी ०४ अग्नीशमन वाहने रेस्क्यू साहीत्यांसह सज्ज आहेत.

## प्रकाशने विभाग

प्रकाशने विभागामार्फत श्री साईबाबांचे जीवनकार्यावर आधारीत मराठी व अन्य १६ भाषेतील **श्रीसाईसच्चरित या ग्रंथांसह, वेगवेगळ्या भाषेतील एकूण ८२ प्रकारची पुस्तके, २७ प्रकारचे वेगवेगळे फोटो** व **११ प्रकारचे ऑडिओ / व्हीडीओ सीडी** तसेच नवीन तंत्रज्ञानानुसार समाधी मंदिरातील आरत्यांचे **०२ प्रकारचे दृकश्राव्य पध्दतीचे युएसबी (ऑडीओ, व्हीडीओ)** उपलब्ध करुन देणेत आलेले आहेत. दरवर्षी वार्षिक दैनंदिनी ०२ प्रकारात व दिनदर्शिका ०९ प्रकारात छापून प्रकाशित करण्याची कार्यवाही प्रकाशने विभाग करत आहे. श्री साईंच्या जीवनावरील सर्व प्रकाशने सवलतीच्या दरात साईभक्तांना पुस्तक काऊंटर्सवर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तसेच ज्या प्रकाशनाचे मुल्य रु.१० पेक्षा अधिक आहे, अशा पुस्तके व सीडींवर साईभक्तांना २० टक्के सूट दिली जाते.

| अ.नं. | भाषा | उपलब्ध पुस्तकांची निवडक नांवे |
|---|---|---|
| ०१ | मराठी | श्री साईसच्चरित, श्री साईंचे सत्यचरित्र, शिलधी, मुलांचे साईबाबा, दैनंदिन साईबोध, साईबाबांची शिकवण व तत्वज्ञान, साईनाथ भजनमाला, साईबाबा अवतार व कार्य, श्री साईनाथ सगुणोपासना, श्री साईनाथ स्तवनमंजिरी, रुद्राध्याय, गुरुपाठ अभंग, साईलीलामृत, अर्वाचीन भक्त व संतलीलामृत-चार अध्याय, दादासाहेब खापर्डे यांची शिर्डी रोजनिशी, श्री साईसच्चरित डिलक्स पोथी, साईचरित्र भावार्थ (भाग-१ व २) आदि. |
| ०२ | हिंदी | श्री साईसतच्चरित्र, श्री साईसतच्चरित्र पोथी, साई चरित्र दोहावली, खापर्डे डायरी, मुलांचे साईबाबा, साईलीलामृत, श्री साईनाथ सगुणोपासना, साईनाथ स्तवनमंजिरी, साईनाथ भजनमाला, चार अध्याय आदि. |
| ०३ | इंग्रजी | श्री साईसच्चरित, खापर्डे डायरी, मुलांचे साईबाबा, साईबाबा ऑफ शिर्डी - प्रधान, श्री सदगुरु साईनाथ सगुणोपासना, श्री साईनाथ स्तवनमंजिरी, श्री साई समर्थ चरित्र, चित्रावली |
| ०४ | तेलुगु | श्री साईसच्चरित, श्री साई सत्य चरित्र, मातृसाई, मुलांचे साईबाबा, साईनाथ सगुणोपासना (पूजाविधी), स्तवनमंजिरी, श्री साईसतच्चरित्र तेलुगु पोथी (मनि अम्मा), खापर्डे डायरी |
| ०५ | गुजराथी | श्री साईसच्चरित, मुलांचे साईबाबा, साईलीलामृत, श्री साईनाथ सगुणोपासना, साईनाथ स्तवनमंजिरी, दैनंदिन साईबोध, साईबाबांची शिकवण व तत्वज्ञान, साईबाबा अवतार व कार्य, शिलधी, साईंचे सत्यचरित्र, चार अध्याय आदी. |
| ०६ | कन्नड | श्री साईसच्चरित, मुलांचे साईबाबा, श्री साईनाथ स्तवनमंजिरी, श्री साईनाथ सगुणोपासना. |
| ०७ | तामिळ | श्री साईसच्चरित, खापर्डे डायरी, मुलांचे साईबाबा, श्री सदगुरु साईनाथ सगुणोपासना. |
| ०८ | बंगाली | श्री साईसच्चरित, श्री साईनाथ सगुणोपासना, चार अध्याय, श्री साईनाथ स्तवनमंजिरी |
| ०९ | उर्दू | श्री साईसच्चरित. |
| १० | पंजाबी | श्री साईसच्चरित, श्री साईनाथ सगुणोपासना, श्री साईनाथ स्तवनमंजिरी |

| अ.नं. | भाषा | उपलब्ध पुस्तकांची निवडक नांवे |
|---|---|---|
| ११ | सिंधी | श्री साईसच्चरित, श्री साईनाथ सगुणोपासना |
| १२ | नेपाळी | श्री साईसच्चरित |
| १३ | ओरिया | श्री साईसच्चरित, श्री सदगुरु साईनाथ सगुणोपासना |
| १४ | मल्याळम | श्री साईसच्चरित, श्री साईसच्चरित पोथी |
| १५ | कोकणी | श्री साईसच्चरित |
| १६ | आसामी | श्री साईसच्चरित, श्री साईनाथ सगुणोपासना |
| १७ | जर्मन | श्री साईनाथ स्तवनमंजिरी, श्री साई सगुणोपासना. |

तसेच संस्थान व्यवस्थापनामार्फत अहवाल सालात, श्री साईबाबा दैनंदिनी ०२ प्रकारात व श्री साई दिनदर्शिका ०९ वेगवेगळया प्रकारात प्रकाशित करण्यात येऊन वाजवी किंमतीत साईभक्तांना उपलब्ध करवून देण्यात आलेल्या आहेत.

संस्थान व्यवस्थापनामार्फत उपलब्ध करुन देणेत आलेल्या विविध मुद्रित, दृकश्राव्य प्रकाशने विक्री संख्येची गेल्या ०३ वर्षातील तुलनात्मक माहिती खालीलप्रमाणे :

| अ.नं. | कालावधी (वर्ष) | मुद्रित (पुस्तके / फोटो) विक्री संख्या | दृक-श्राव्य प्रकाशने विक्री संख्या | श्री साई दैनंदिनी / दिनदर्शिका विक्री संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | सन २०१७-१८ | ९,७४,२३२ | १७,४८३ | ६,८४,७५६ |
| ०२ | सन २०१८-१९ | १०,०४,९५९ | १४,९५४ | ६,८६,७३४ |
| **०३** | **सन २०१९-२०** | **७,८५,५३०** | **७,६५१** | **७,२२,५१७** |

याव्यतिरिक्त संस्थान व्यवस्थापनाने चेन्नई (तामीळनाडू), हैद्राबाद (तेलंगणा) व बंगळुरू (कर्नाटक) या विविध राज्यातील ०३ महानगरांमध्ये भक्तांना माहिती सुविधा केंद्राची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. या माहिती सुविधा केंद्रातूनही भक्तांना उपरोक्त प्रकाशने विक्रीसाठी उपलब्ध करुन दिलेली आहेत. तसेच उपरोक्त संस्थान प्रकाशने ऑनलाईन, मनिऑर्डर, चेक, डीडी या माध्यमांद्वारे रक्कम स्विकारुन पोष्टाद्वारे/ ट्रान्सपोर्टद्वारे खरेदीसाठी भक्तांना उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.`

## माहिती तंत्रज्ञान विभाग

विश्वस्तव्यवस्थेचे दैनंदिन कार्यालयीन कामकाजात गती व अचूकता यावी, वेळेची व मानवी श्रमांची बचत व्हावी यादृष्टीने संगणकीय कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेली असून, संस्थानचे सर्व कार्यालये संगणक कार्यप्रणालीव्दारे एकमेकांशी जोडण्यात आलेली आहेत. सध्या संगणकीय कार्यप्रणालीव्दारे साईभक्तांना इंटरनेटव्दारे निवासव्यवस्था, श्री साई दर्शन / आरती पासेस आरक्षित करणे, देणगी देणे, संस्थान प्रकाशित पुस्तके, फोटो खरेदी करणे आदि सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेल्या आहेत. तसेच संस्थान परिसरातील सर्व संगणकीय कार्यप्रणालीचे सुसूत्रीकरण व नियंत्रण करणे आदि कामे केली जातात.

माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत श्री साईबाबांच्या जीवनकार्याविषयी व विश्वस्तव्यवस्थेच्या कार्यपध्दतीविषयी अधिकृत माहिती देणारी www.sai.org.in इंग्रजी, मराठी व हिंदीतील वेबसाईट (संकेतस्थळ) सुरु करण्यात आलेली आहेत. माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत भक्तांना पुरविणेत येणाऱ्या सुविधा :-

०१. श्रीं ची ऑनलाईन दर्शन सुविधा sai.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आली असून, दररोज साधारणत: १२ ते १५ हजार साईभक्त संकेतस्थळास भेट देतात.

०२. संस्थान प्रकाशित दहा भाषांतील श्री साईसच्चरित संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

०३. मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम, संस्थानच्या विविध सेवा-सुविधा, देणगीबाबतची माहिती, शिर्डी दर्शन, रेल्वे वेळापत्रक आदि माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

०४. संस्थानचे अधिकृत वेबसाईटव्दारे जगातील कोणत्याही देशातून, त्या देशाचे चलनात ऑनलाईन देणगी स्वीकारणेची सुविधा सुरु करणेत आलेली आहे.

०५. साई मंदिरातील Live Darshan ही सुविधा टाटा-स्काय या डीटीएच सेवा पुरविणाऱ्या कंपनीमार्फत, टाटा-स्कायची सेवा घेणाऱ्या साईभक्तांसाठी टाटा स्कायचे डिश टीव्हीद्वारे व संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

०६. साईभक्तांच्या वेळेचा सदुपयोग व्हावा व प्रशासनास गर्दीचे नियोजन करणे सुलभ व्हावे याकरीता दर्शनरांग व्यवस्थापन कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेत आलेली आहे.

०७. साईभक्तांच्या सुविधेसाठी संस्थानचे सर्व निवासस्थानांचे ठिकाणी मोफत वायफाय सुविधा कार्यान्वीत करणेत आलेली आहे.

०८. online.sai.org.in या संकेतस्थळाव्दारे जगातील साईभक्तांना घरबसल्या निवास, दर्शन, आरती आदि सुविधांचे आरक्षण तसेच देणगीही जमा करणेची सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

०९. IRCTC चे E-Ticket या पोर्टलव्दारे रेल्वे तिकीट आरक्षीत करुन साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांसाठी online.sai.org.in या संकेतस्थळाव्दारे दर्शन पास आरक्षीत करण्याची सुविधा दि.२६.०१.२०१९ पासुन उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

साईभक्तांना सुलभ व सुरळीत सेवा उपलब्ध व्हाव्यात, प्रशासकीय कामांमध्ये अचूकता व गती यावी, त्याचे व्यवस्थापन पारदर्शक पध्दतीने व्हावे याकरीता अद्यायवत संगणकीय जाळे विकसित करुन साईटेक प्रकल्पांतर्गत विविध प्रणाली विकसित करुन कार्यान्वित करणेत आलेल्या आहेत. सदर प्रकल्पाअंतर्गत संस्थानची सर्व निवासस्थाने, श्री साई प्रसादालय, साई आश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा, शैक्षणिक संकुल, रुग्णालये आदि सर्व संस्थान परिसरामध्ये संगणकीय जाळे उभारणेत आलेले आहे. संस्थानच्या विविध विभागांसाठी आवश्यक संगणकीय आज्ञावली, डेटा सेंटर, डेटा रिकव्हरी सेंटर, संगणकीय साहित्य देखभाल दुरुस्ती कक्ष आदि तयार करणेत आलेले आहेत. याव्यतिरिक्त वायफाय, वायमॅक्स या सारख्या आधुनिक

तंत्रज्ञानाव्दारे संस्थानचे मुंबई येथील शाखा कार्यालयासह, सिकंदराबाद, चेन्नई, बंगळुरू, दिल्ली इत्यादी ठिकाणची माहिति सुविधा केंद्रे शिर्डी कार्यालयाशी जोडण्यात आलेली आहेत.

**पाणीपुरवठा विभाग**

अहमदनगर जिल्हा आणि प्रामुख्याने जिल्ह्याचा उत्तर भाग पर्जन्यमान कमी असल्यामुळे पाण्याच्या बाबतीत दुष्काळी समजला जातो. श्री क्षेत्र शिर्डी सारख्या पवित्र तीर्थक्षेत्री श्री साईभक्तांना स्वच्छ व निर्मळ पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी श्री साईबाबांच्या आशीर्वादाने संस्थान व्यवस्थापनाने सन १९९५ मध्ये सुमारे ०१ कोटी रुपये गुंतवून राज्य शासनाच्या सहकार्याने स्वतंत्र व परिपूर्ण अशी ३११ दशलक्ष लिटर्स साठवण क्षमतेची शिर्डी संस्थान-कनकुरी-पिंपळवाडी पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत केली आहे.

या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत मौजे कनकुरी, तालुका राहाता शिवारात ०४ साठवण तलाव असून त्यांची साठवणुक क्षमता अनुक्रमे १६४ दशलक्ष लिटर्स, ८७ दशलक्ष लिटर्स, १८ दशलक्ष लिटर्स व ४२ दशलक्ष लिटर्स आहे. सध्या संस्थान व्यवस्थापनाकडे एकूण ३११ दशलक्ष लिटर्स पाणी साठवणुकीची क्षमता उपलब्ध आहे.

या पाणीपुरवठा योजनेस नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडून अहवाल सालात **१२६.०१ कोटी लिटर्स** पाणीपुरवठा करणेत आला असून, त्यापोटी संस्थानने पाटबंधारे विभागाचे मागणीनुसार **रक्कम रु.६.३६ लक्ष** पाणीपट्टी कर शासनाकडे भरलेला आहे. या पाणीपुरवठा योजनेतून कनकुरी व पिंपळवाडी या गावासह संस्थानच्या विविध भक्तनिवास इमारती, प्रसादालय, रुग्णालये व कर्मचारी निवासस्थाने इत्यादींना प्रतिदिनी अंदाजे ४० ते ४५ लाख लिटर्स स्वच्छ व शुध्द सुरक्षित पिण्याचे पाणी अखंड पुरविण्यात येत आहे.

स्वच्छ व शुध्द पाणीपुरवठा करणेसाठी संस्थानमार्फत ब्लिचिंग पावडर, ॲलम (तुरटी) व क्लोरीन गॅस योग्य प्रमाणात वापरणेत येत आहे. या योजने अंतर्गत पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याचे विभागांतर्गत यंत्रणेव्दारे तसेच शासनाच्या आरोग्य विभागाच्या प्रयोगशाळेमध्ये नियमीत तपासणी करणेत येते.

तसेच रुग्णालये, व्दारावती भक्तनिवास परिसरात वापरणेत येणाऱ्या पाण्यावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाव्दारे प्रक्रिया (रिसायकलिंग) करणेत येऊन, त्याचा साईनगर व व्दारावती परिसरातील बगीचासाठी पुनःवापर करणेत येतो. अशाच प्रकारे साईआश्रम प्रकल्पांमध्येही वापरणेत येणाऱ्या पाण्याचे रिसायकलींग करुन ते प्रसाधनगृहातील फ्लशसाठी वापरणेत येत आहे. यामुळे मोठया प्रमाणावर पाण्याची बचत झालेली आहे.

श्री साईबाबाचे दर्शनासाठी येणा-या भक्तांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून, भक्तांना निवास, प्रसादभोजन, वैद्यकिय सेवा आदि मुलभूत सेवा उपलब्ध करुन देणेत येत आहेत. गेल्या काही वर्षात निवासी प्रकल्पांमध्ये तसेच प्रसादभोजन, लाडूप्रसाद आदि सुविधांसाठी प्रसादालय प्रकल्प कार्यान्वीत करणेत आलेला आहे. या सर्व सुविधांसाठी आवश्यक असलेल्या पाण्याची गरज लक्षात घेऊन, निळवंडे धरणातून शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना राबविणेचे प्रस्तावित आहे. या योजनेत टप्पा क्र.१ अंतर्गत वॉटर ट्रीटमेंट प्लान्ट, पाण्याच्या टाक्या, संस्थान परिसरात नव्याने पाणी वितरीका टाकणे इ. करिता रु.२३.८१ कोटी रक्कमेचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असून प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली

आहे. संयुक्त पाणीपुरवठा योजना टप्पा क्र.२ अंतर्गत निळवंडे धरणापासुन ते शिर्डी पर्यन्त व पुढे कोपरगाव शहरापर्यन्त थेट अंदाजे ९० कि.मी. जलवाहिनी टाकणे इत्यादी कामांसाठी अंदाजे रक्कम रु. २०५.६० कोटी मात्र खर्च अपेक्षित आहे.

**बगीचा विभाग**

या विभागामार्फत संस्थानच्या हद्दीत व मंदिर परिसरामध्ये असलेले वृक्ष, नारळाची झाडे, बगीचा, फुलझाडे व लॉन यांची निगा राखून परिसर सुशोभित करण्यात येत आहे. संस्थान परिसरात गुलाब गार्डन, ग्रीन हाऊस इत्यादी तयार केलेली असून मंदिरास लागणारी फुले याच बगीचामधून उपलब्ध होत आहेत.

बगीचा विभागामार्फत व्दारावती भक्तनिवास परिसरात नयनरम्य बगीचा विकसित करणेत आला असून, यामध्ये मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी उपलब्ध करुन देणेत आली आहे. या बगीचामध्ये सुश्राव्य संगीताच्या श्रवणात सर्व वयोगटातील ग्रामस्थ, कर्मचारी व साईभक्त फिरणे, व्यायाम करणे आदि प्रकारांचा आनंद दररोज लुटतात.

**विद्युत विभाग**

मंदिर व मंदिर परिसरासह संपूर्ण संस्थान परिसरातील निवासस्थान इमारती, धर्मशाळा, रुग्णालये, कर्मचारी वसाहत आदि ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीतर्फे पुरविण्यात येणाऱ्या वीज वितरणावर विद्युत विभागामार्फत नियंत्रण व संचलन ठेवले जाते. वीज वितरण कंपनीचा वीज पुरवठा खंडीत झालेस विद्युत विभागामार्फत संस्थान परिसरात विविध ठिकाणी विविध क्षमतचे एकूण २१ विद्युत जनित्रे कार्यान्वीत असून, त्याव्दारे विनाखंडीत विद्युत पुरवठा करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त श्री साईंचे नियमित निघणारे रथ-पालखी मिरवणुकीसाठी १५ केव्हीए क्षमतेच्या ०१ स्वतंत्र जनरेटरची सुविधा उपलब्ध करुन देणेत आली आहे. एनर्जी सेव्हींगसाठी सुधारीत यंत्रणा वापर करणेत येत आहे. तसेच पोष्ट भोयरे पठार, तालुका व जिल्हा अहमदनगर येथे **पूर्णांकिंत रक्कम रु. १५.४० कोटी खर्चून २.५ मेगावॅट क्षमतेचा पवन ऊर्जा प्रकल्प** कार्यान्वीत केलेला असून, त्याव्दारे अहवाल सालात **४६,२०,७२३ युनिट** वीज निर्मिती करण्यात येऊन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर पवन ऊर्जा प्रकल्पाव्दारे **सन २०१९-२०** या वर्षात संस्थानला **रु. २,४१,३६,३८९/- मात्र** इतकी रक्कम वीज विक्रीतून मिळाली आहे.

संस्थान व्यवस्थापनास पवन ऊर्जा प्रकल्प कार्यान्वीत केलेपासून, म्हणजेच माहे ऑगस्ट, २००७ ते माहे मार्च, २०२० अखेर या कालावधीत **रु. २५,३४,३०,४४९/- मात्र** इतकी रक्कम पवन ऊर्जेपासून निर्माण झालेल्या वीज विक्रीतून मिळालेली आहे.

**मेकॅनिकल विभाग**

मंजूर आकृतीबंधानुसार मेकॅनिकल विभाग सुरु करणेत आलेला असून, या विभागामार्फत संस्थान आस्थापनेवरील विविध विभागांकडे असणारे तांत्रिक साहित्य जसे वातानुकूलित यंत्रे, लिफ्टस्, प्रसादालय

विभागाकडील मशिनरी, बायोगॅस प्रकल्प, गॅस टँक आदि मशिनरींची उभारणी, देखभाल-दुरुस्ती इत्यादी कामे करणेत येत आहेत.

**बांधकाम विभाग**

संस्थान परिसरात एकुण २२६७८५ चौ.मी. बांधकाम क्षेत्राच्या ६७ इमारती आहेत. सर्व इमारतींची देखभाल-दुरुस्ती करणे, बांधकामाची विकासात्मक कामे हाती घेऊन ती पूर्णत्वास नेणे आदि कामे बांधकाम विभागामार्फत केली जातात. सध्या या विभागामार्फत संस्थान परिसर व अनुदान तत्वावर शिर्डी गांवात विविध विकासकामे सुरु असून, त्यावर नियंत्रण ठेवणे, त्यांचे नियोजन करणे आदि कामे बांधकाम विभागामार्फत केली जात आहेत. सुरु असलेल्या विकासकामांची माहिती स्वतंत्ररित्या दिली आहे.

**वाहन विभाग**

साईभक्त, विद्यार्थी, रुग्ण, अधिकारी व इतर कर्मचारी वर्गास वाहन विभागामार्फत वेगवेगळ्या वाहनांद्वारे सेवा दिली जाते. वाहन विभागामार्फत मंदिर ते श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व श्री साई प्रसादालय परिसर अशी विनाशुल्क बससेवा साईभक्तांसाठी पूर्णवेळ उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. संस्थानच्या शैक्षणिक संकुलात शिक्षण घेणाऱ्या परिसरातील व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची ने-आण करण्याकरीता नाममात्र शुल्क आकारुन स्कूल बसेस उपलब्ध करवून देण्यांत आलेल्या आहेत.

संस्थानच्या श्री साईनाथ व श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील रुग्णांच्या सोयी-सुविधेसाठी रुग्णवाहिका व शववाहिका नाममात्र दराने उपलब्ध करुन दिल्या जातात.

यासाठी स्वतंत्ररित्या वाहन विभाग कार्यरत असून, या विभागाकडे खाली नमूद केलेप्रमाणे विविध प्रकारची वाहने उपलब्ध आहेत –

| अ.नं. | वाहनांचा तपशील व वापर | संख्या |
|---|---|---|
| ०१ | कार्यालयीन कामकाजाकरीता वाहने | १७ |
| ०२ | रुग्णांच्या सुविधेसाठी वाहने (रुग्णवाहिका व शववाहिका इ.) | १२ |
| ०३ | माल व साहित्य वाहतुकीकरीता वाहने | २६ |
| ०४ | ट्रेलर व टँकर | ०८ |
| ०५ | भक्तांच्या / विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी वाहने (बसेस) | ३६ |
| ०६ | आपत्कालीन वाहने | ०३ |
| ०७ | दुचाकी वाहने | ०४ |
| ०८ | इतर वाहने (क्रेन, कॅश व्हॅन, टॉयलेट व्हॅन, जेट व सक्शन मशिन) | ०६ |
| ०९ | भक्तांच्या सुविधेसाठी बॅटरी कार | ०४ |
| १० | भक्तांच्या सुविधेसाठी फिरती स्वच्छतागृहे | १० |
| | **एकूण वाहनांची संख्या -** | **१२६** |

उपरोक्त वाहनांपैकी, साई आश्रम निवासस्थान प्रकल्पाचा परिसर मोठा असल्याने, वृध्द-अपंग भक्तांच्या सोयी-सुविधेसाठी बॅटरीवर चालणारी ०४ वाहने (इलेक्ट्रीक कार) उपलब्ध करुन देणेत आलेल्या आहेत. अशा प्रकारे वाहन विभागाकडे सर्व प्रकारची वाहने मिळून **एकुण १२६ वाहने** उपलब्ध आहेत.

## खरेदी विभाग

या विभागामार्फत प्रसादालय, लाडू प्रसाद निर्मिती, कॅन्टीन या विभागांसाठी तसेच इतर विविध विभागांना आवश्यक असणाऱ्या मालाची वार्षिक खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने दरपत्रके व ई-निविदा यांची मागणी करुन पारदर्शकपणे कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे साईभक्तांना अखंडपणे प्रसाद भोजन, प्रसाद लाडू व कॅन्टीन सुविधा पुरविल्या जातात.

यामध्ये प्रामुख्याने प्रसादालयासाठी लागणारा दैनंदिन किराणा माल, गाईचे शुध्द तूप, विद्युत, पाणीपुरवठा व आरोग्य विभागांना दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी आवश्यक असणारे साहित्य, दैनंदिन कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक असणारी स्टेशनरी, फर्निचर इत्यादी साहित्यांचा समावेश आहे.

वरीलप्रमाणे खरेदी केलेल्या तेल, तूप व इतर किराणा मालाची भांडार विभागाच्या समन्वयाने वेगवेगळया शासकीय NABL व संस्थान प्रयोगशाळेकडून वेळोवेळी तपासणी करण्यात येते.

## भांडार विभाग

या विभागामार्फत संस्थानच्या प्रसादालयासाठी आवश्यक गहू, हरभरा, तांदूळ, तूप व इतर किराणा माल तसेच अन्य विभागांसाठी आवश्यक विद्युत साहित्य, स्टेशनरी, पुस्तके, फोटो, कॅलेन्डर्स, सीडी/डिव्हीडी, स्वच्छता साहित्य आदिंची योग्य प्रकारे साठवणूक करुन, वेळोवेळी आवश्यकतेनुसार संबंधित विभागांना त्यांचे मागणीप्रमाणे पुरविण्यात येते.

संस्थानच्या प्रसादालय विभागासाठी मुख्यत: खरेदी केलेल्या गहू, तांदूळ, हरबरा, तेल, तूप, दाळी व इतर किराणा माल, प्रकाशने विभागांकडील विविध साईचरित्र व इतर पुस्तके, सीडी / डीव्हीडी, विविध प्रकारचे फोटो, आरोग्य, बांधकाम, बगीचा, विद्युत विभागासाठी आवश्यक विविध साहित्य व सर्व विभागांसाठी आवश्यक स्टेशनरी इत्यादी साहित्याची योग्य प्रकारे साठवणूक करणेसाठी संस्थानने शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२४/१ पैकी मधील जागेत तसेच दैनंदिन वापरातील माल व इतर साहित्य साठवणूकीसाठी साईनिवास अतिथीगृहाचे तळमजल्यावर असे एकुण दोन स्वतंत्र गोडाऊन उपलब्ध आहे.

## आरोग्य विभाग

आरोग्य विभागामार्फत संस्थान परिसरात २४ तास स्वच्छता राहावी, या दृष्टीने दैनंदिन कामकाजाचे नियोजन करणेत आलेले आहे. साईभक्तांचे आरोग्याचे दृष्टीने शिर्डी शहरात ही स्वच्छता राखणेकामी शिर्डी

नगरपंचायत, शिर्डी यांना काही प्रमाणात संस्थान मदत करीत असते. त्यामुळे एकूणच शिर्डी व संस्थान परिसरातील स्वच्छतेमुळे भक्तांचे निश्चितच समाधान होते. आरोग्य विभागातील स्वच्छता कर्मचा-यांना संस्थानमार्फत स्वच्छता करणेसाठी आवश्यक असणारे साहित्यासह, कर्मचा-यांच्या सुविधेसाठी गमबूट, रेनकोट आदि उपलब्ध करुन देणेत आलेले आहेत. याव्यतिरिक्त श्री साई प्रसादालय, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये, व्दारावती भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा येथील स्वच्छता आऊटसोर्सिंग पध्दतीने कंत्राटदारामार्फत करण्यात येते.

**कामगार विभाग**

कामगार विभागामार्फत संस्थान कर्मचाऱ्यांच्या रजा, सुट्टया, गैरवर्तन, कर्मचारी विषयक न्यायालयीन कामकाजासह कंत्राटी कर्मचारी विषयक कामकाज पाहिले जाते. तसेच वेळोवेळी कंत्राटदार नियुक्ती व त्यांचेमार्फत संस्थानच्या विविध विभागांना आवश्यकतेनुसार कंत्राटी कर्मचारी पुरवून संस्थानचे दैनंदिन कामकाज सुरळीत पार पडेल याची दक्षता घेणेत येते. या विभागामार्फत साईसेवक योजना राबवविण्यात येत असून त्याचा सविस्तर तपशिल ठळक बाबींमध्ये नमूद करण्यात आला आहे.

**मागासवर्ग कक्ष**

सामान्य प्रशासन विभागांतर्गत असलेल्या आस्थापना कक्षास कर्मचारी विषयक सेवाप्रवेश नियम, पदोन्नती, आरक्षण व त्यासंबंधीत कर्मचारी शंभर बिंदू नामावली इत्यादी बाबीं संदर्भात सहाय्य व्हावे यादृष्टीने संस्थान आस्थापनेवर **मागासवर्ग कक्ष** स्वतंत्ररित्या कार्यरत करणेत आलेला आहे. या मागासवर्ग कक्षाच्या माध्यमातून शासन निर्णयातील विविध तरतुदीनुसार कर्मचारीविषयक अनुषंगिक कामकाज करणेत येत आहे. याव्यतिरिक्त शासन स्तरावरील पत्रव्यवहाराच्या नोंदी घेऊन त्याची माहिती प्रशासनास व संबंधितांना वेळावेळी व आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देणेत येत आहे.

**अभिलेख कक्ष**

या विभागामार्फत संस्थानचे विविध रेकॉर्ड, फाईल्स, दस्तऐवज शासकीय नियमानुसार अ, ब, क व ड प्रकारात जतन करुन ठेवणेत येतात. तसेच महत्वाचे कागदपत्रांचे स्कॅनिंग करुन डिजीटल पध्दतीने जतन करणेचे काम सुरु करणेत आलेले आहे. कागदपत्रे जतन करणेसाठी आवश्यक ती उपाययोजना करणेत आलेली आहे. तसेच संस्थानच्या विविध विभागांच्या निरुपयोगी, खराब वस्तू / साहित्य ई-निविदा मागवून उच्चतम दर देऊ केलेल्या निविदाधारकांस विक्री करणेत येते. गेल्या ०३ अहवाल वर्षामध्ये विविध **निरुपयोगी साहित्य विक्री** पोटी प्राप्त झालेल्या रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | कालावधी (वर्ष) | रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१ | सन २०१७-१८ | ३६,८१,७२२/- |
| ०२ | सन २०१८-१९ | ४५,१३,७४६/- |
| **०३** | **सन २०१९-२०** | **२४,९७,१४८/-** |

## ध्वनीक्षेपण व टेलिफोन विभाग

ध्वनीक्षेपण विभागामार्फत श्री साईबाबांचे समाधी मंदिरात होणा-या चारही आरत्या व इतर दैनंदिन कार्यक्रमांसाठी साऊंड सिस्टिम व्यवस्था केली जाते. तसेच मंदिरातील लाईव्ह ऑडिओ प्रक्षेपण समाधी मंदिर, मंदिर परिसर, दर्शन रांग हॉल्स, सर्व भक्तनिवासस्थाने, श्री साईप्रसादालय, संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर केले जाते. तसेच मंदिरातील चारही आरतींचा ऑडिओ शिर्डी एफएम रेडिओ केंद्रावरुन प्रसारीत करणेत येत आहे. तसेच गर्दीचे वेळी  साईभक्त, लहान मुले हरवतात-सापडतात, काहींचे सामान-चीजवस्तू गहाळ होतात त्याचे ध्वनीप्रक्षेपण करणेकामी मंदिर परिसरात सुचना केंद्र कार्यान्वित करणेत आलेले आहे. याव्यतिरिक्त संस्थानमार्फत आयोजित सर्व सांस्कृतिक व इतर व्यासपीठ कार्यक्रमांसाठी साऊंड सिस्टिम व्यवस्था उपलब्ध करुन दिली जाते.

टेलिफोन विभागांतर्गत, विश्वस्तव्यवस्थेचे दैनंदिन कार्यालयीन कामकाज पार पाडणेसाठी मंदिर व संस्थान परिसरात असलेली विविध कार्यालये अत्याधुनिक अशा अद्ययावत अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेव्दारे एकमेकांशी जोडण्यात आलेली आहेत. संस्थानला साधारणतः प्रतिदिनी २००० ते २५०० येणारे दूरध्वनी कॉल्स व संस्थानकडून केले जाणारे साधारणतः ७०० ते ८०० दूरध्वनी कॉल्स नियंत्रित करणेसाठी तसेच भक्तांचे सुविधेसाठी २४x७ कार्यान्वीत असणारा ऑपरेटर कक्ष स्वतंत्ररित्या कार्यान्वीत करणेत आलेला आहे. तसेच मा.व्यवस्थापन समिती, अधिकारी व इतर कर्मचारी वर्ग यांचेमध्ये कामकाजाचा समन्वय राहावा, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेशी त्वरीत संपर्क साधून तातडीने कामे व्हावीत या दृष्टीने भ्रमणदूरध्वनी योजना (Group Mobile System) कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

## सीसीटीव्ही कक्ष

मंदिर व मंदिर परिसरात भक्तांचे सुरक्षेसाठी व आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ उपाययोजना करता यावी म्हणून सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीत करणेत आलेली आहे. या यंत्रणेत पीटीझेड व सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेत आलेले आहेत. याची दुरुस्ती व देखभाल या विभागामार्फत पाहिली जाते. सीसीटीव्ही  यंत्रणेचा मुख्य नियंत्रण कक्ष मंदिर परिसरातील गुरुस्थान समोरील ईमारतीत तयार करणेत आलेला असून, हा नियंत्रण कक्ष २४ तास कार्यान्वीत ठेवणेत आलेला आहे.  तसेच सीसीटीव्ही कक्षामार्फत महत्वाचे कार्यक्रमाचे, प्रसंगाचे, बैठकांचे फोटोग्राफी व व्हिडिओ शुटींग केले जाते. श्रींचे दर्शन Digitalization यंत्रणा पुर्णतः कार्यान्वित झाल्याने साईभक्तांसाठी संस्थान व परिसरात श्रींचे लाईव्ह दर्शन घेणे सुलभ झाले आहे.

## विधी विभाग

विधी विभागामार्फत संस्थानच्या विविध न्यायालयातील दाव्यांचे कामकाज पहाणे, विविध विभागांना कराव्या लागणाऱ्या करारांचे मसुदे तयार करुन देणे, तपासून देणे, भक्तांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी संस्थान परिसरातील उपलब्ध असलेले दुकान गाळे लिलाव पध्दतीने भाडे तत्वावर उपलब्ध करणे आदि कामे केली जातात.

याव्यतिरिक्त विधी विभागामार्फत, विविध न्यायालयांपुढे संस्थानने दाखल केलेले ४ व संस्थान विरुध्द दाखल झालेले ५७ दावे असे एकुण ६१ न्यायालयीन दाव्यांचे कामकाजाबाबत संस्थान वकिलांशी समन्वय साधून कार्यवाही सुरु आहे.

## मालमत्ता विभाग

संस्थान मालकीचे जंगम व स्थावर मालमत्तेचे जतन व संरक्षण व्हावे, संस्थान व्यवस्थापनास विकास कामांचे दृष्टीने आवश्यक जमिनीचे संपादन करता यावे, जमीन महसूल विषयक बाबींमध्ये सुसूत्रीकरण व्हावे म्हणून जमीन महसुल विषयक कामे एकत्रित करुन स्वतंत्र मालमत्ता विभाग कार्यरत करणेत आला. सध्या या विभागामार्फत जमीन महसुलासह भूसंपादन व जमीन खरेदी विषयक सर्व कामे पार पाडली जात आहेत.

# अहवाल सालातील ठळक बाबी

१) श्रींचे दर्शनार्थ येणा-या साईभक्तांना ध्यान साधनेसाठी नव्याने संस्थानमार्फत श्री साई सत्यव्रत पुजा हॉलचे पहिल्या मजल्यावर वातानुकूलित **" ध्यान मंदिर "** सुरु करण्यात आले आहे.

२) मा. व्यवस्थापन समितीने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने दिनांक २५ फेब्रुवारी, २०१७ रोजीचे सभेत, श्री क्षेत्र गजानन महाराज शेगांवचे धर्तीवर श्री क्षेत्र शिर्डी येथेही सेवेकरी सेवा सुरु करणेचा निर्णय घेतलेला होता. या योजनेअंतर्गत **सहभाग घेणारे सेवेकरी** यांना **साईसेवक** म्हणून संबोधणेत येते. दिनांक २९ जुलै, २०१७ रोजी प्रत्यक्ष या **साईसेवक** योजनेस प्रारंभ करणेत आला. या योजनेत २१ साईसेवक यांचा ०१ गट याप्रमाणे दर मंगळवार ते सोमवार असा १० गटांना सेवेचा कालावधी नेमून देणेत येत आहे. **साईसेवकांना** संस्थानमार्फत विनामुल्य निवास, भोजन व दर्शन/आरती व्यवस्था आदि सुविधा देणेत येत आहेत. तसेच या साईसेवक योजनेतील व्यक्तींसाठी एक वर्षाचा **जनता अपघात विमा संरक्षण** घेण्यात आले आहे. कामगार विभागामार्फत **साईसेवक** या योजनेत अहवाल सालात ४२० **गटातील ९००४ साईसेवकांनी** मंदिर परिसरासह प्रसादालय, कॅन्टीन, प्रकाशने, संरक्षण, रुग्णालये, बुंदीप्रसाद / उदीप्रसाद वाटप, भक्तांना पिण्याचे पाणी वाटप इत्यादी ठिकाणी / विभागात श्री साई सेवेचा लाभ घेतला आहे.

३) जनसंपर्क विभाग व इतर निवासस्थाने विभागामार्फत वितरित करणेत येणारे **विनाशिफारस** सशुल्क **दर्शन** पास सुविधेचा **१६,८९,५०९ भक्तांनी व** सशुल्क **आरती** पास सुविधेचा **१,८२,७३५ भक्तांनी** लाभ घेतला. त्यापासून संस्थानला अनुक्रमे **रु. ३३,७९,०१,८००/- व रु. ८,४१,४०,४००/-** उत्पन्न मिळाले.

४) संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावरुन (ऑनलाईन पध्दतीने) वितरित करणेत येणारे सशुल्क **दर्शन** पास सुविधेचा **७,०१,६०५ भक्तांनी व** सशुल्क **आरती** पास सुविधेचा **२,०७,१७० भक्तांनी** लाभ घेतला. त्यापासून संस्थानला अनुक्रमे **रु. १४,०३,२१,०००/- व रु. ९,३१,६८,२००/-** उत्पन्न मिळाले.

५) जनसंपर्क कार्यालयामार्फत मा.शासनाच्या माहिती व जनसंपर्क संचालनालय विविध विभागांच्या विकास प्रकल्पांच्या / साहित्य खरेदीच्या जाहिर निविदा सूचना स्वरुपातील **६९ जाहिराती** यांचे माध्यमातून प्रसिध्दी देणेत आल्या. तसेच संस्थान मालकीचे हेलीपोर्टवर २६ वेळेस **हेलीकॉप्टर लॅण्डींगकरीता** सशुल्क परवानगी देणेत आली.

६) भक्तांकरीता श्री साई सत्यव्रत (सत्यनारायण) पूजा व श्री साई अभिषेक पूजा यांचे **ऑनलाईन तिकीट बुकींग दिनांक ०१ जून, २०१७ पासून** सुरु करणेत आली आहे. अहवाल सालात श्री साई सत्यव्रत (सत्यनारायण) महापूजेचा **६३,४६८ भक्तांनी** व श्री साई अभिषेक पूजेचा **२८,२९३ भक्तांनी** लाभ घेतला.

७) **संतकवी श्री दासगणू महाराजांची** दि.२४ नोव्हेंबर २०१९ रोजी पुण्यतिथी तसेच दि.०६ जानेवारी २०२० रोजी जन्मतिथी साजरी करण्यात आली. यावेळी श्री समाधी मंदिराचे स्टेजवर संस्थान पुजारी यांचेमार्फत ग्रामस्थ व साईभक्त यांचेकडुन सामुहिक स्तवनमंजिरी वाचनपाठ संपन्न झाला.

८) **श्री साईसच्चरित पारायण सोहळा दिनांक ०२ ऑगस्ट २०१९ ते दि.१० ऑगस्ट २०१९ अखेर** साजरा करणेत आला.

९) दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी **शिर्डी महोत्सव-२०१९** साजरा करणेत येऊन, नाताळ व नववर्षारंभाच्या दिवशी श्री साईंचे दर्शनासाठी होणाऱ्या अलोट गर्दीचा विचार करुन, गतवर्षी प्रमाणेच **दिनांक ३१ डिसेंबर, २०१९** रोजी श्री साईंचे समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवणेत आले होते.

१०) संरक्षण विभागामार्फत **बिनधनी रोख रक्कम रु. २,४९,४०६/- व रु. ४,०७,१६६/- किंमतीच्या बिनधनी वस्तू** (सोने, चांदी, घडयाळे, मोबाईल्स, कॅमेरे, इत्यादी) लेखाशाखेकडे जमा करणेत आलेले आहे.

११) संस्थानचे साईप्रसाद निवासस्थान अंतर्गत **साईनिवास अतिथीगृह, द्वारावती भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा विभाग** या निवासस्थान इमारतीस सन २०१५ मध्ये प्राप्त झालेल्या **ISO-९००१:२०१५** या मानांकनांचे नुतनीकरण होऊन, **दिनांक १५ ऑगष्ट, २०२१ पर्यन्त** मुदतवाढ मिळालेली आहे.

१२) बगीचा विभागामार्फत अहवाल सालातील तीनही उत्सवात तसेच गुढीपाडवा, श्री दत्त जयंती, दीपावली, नववर्षारंभ इत्यादी उत्सवानिमित्त **साईभक्तांकडून समाधी मंदिर व परिसरात देणगीदाखल फुलांची सजावट** करणेत आली.

१३) महाराष्ट्र शासनाने वन महोत्सवांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबविला होता, या वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत संस्थान व्यवस्थापनामार्फत संस्थान मालकीच्या जमिनींमध्ये माहे जुलै, २०१९ मध्ये मोठ्या प्रमाणावर **वृक्षारोपण** कार्यक्रम राबविणेत आला. याशिवाय श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव निमित्ताने दि.०७.१०.२०१९ पासून श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना समाधी मंदिर परिसरात प्रसादरुपाने नियमित मोफत रोपे वाटप करण्यात आले.

१४) श्री साईंचे समाधीवर भक्तांकडून अर्पण केलेल्या फुलांचे हार, गुच्छ इत्यादीपासून उपलब्ध होणारे गुलाब, झेंडू, गुलछडी या अनेक प्रकारचे निर्माल्य फुलांपासून **साई व्दारकामाई  सुवासिक गुलाब अगरबत्ती** तयार करणेसाठी स्थानिक स्तरावरील महिला बचत गटामार्फत योजना राबविणेत आली.

१५) वाहन विभागामार्फत रेल्वेच्या वेळापत्रकानुसार शिर्डी रेल्वे स्टेशन येथे येणा-या साईभक्तांना मंदिर परिसरात आणणेकरिता संस्थानची बससेवा विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच विशेषतः दक्षिण भारतातील भक्तांचे सुविधेसाठी **शिर्डी - नगरसूल रेल्वे स्टेशन - शिर्डी अशी बससेवा** नाममात्र शुल्क आकारुन उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. तसेच ग्रामिण भागातील गरीब व गरजू रुग्णांना मोफत वैद्यकिय उपचार व औषधसेवा देणेकरिता वैद्यकिय पथकासाठी मोबाईल मेडीकल व्हॅन उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

१६) साईभक्तांकडून **श्रीं चे आरतीसाठी वापरणेत येणारे वस्त्र** देणगी स्वरुपात मोठ्या प्रमाणात प्राप्त होत असतात व यामध्ये दिवसें-दिवस वाढही होत आहे. त्यामुळे सर्व **साईभक्तांना समान संधी प्राप्त व्हावी म्हणून लेखाशाखेमार्फत या वस्त्रांचा ड्रॉ पध्दतीने सोडत काढणेत येऊन,** ज्या भक्तांनी वस्त्रे दिलेली आहेत अशा निवड झालेल्या भक्तांची नांवे संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहेत.

१७) लेखाशाखेमार्फत मंदिर व मंदिर परिसरात अपघात होऊन भक्तांचे नुकसान झालेनंतर त्यांना नुकसान भरपाई देता यावी म्हणून दरवर्षी **२५ साईभक्तांकरीता अपघाती / घातपाती विमा** संरक्षण घेणेत येत आहे.

१८) श्री साई प्रसादालयात अनेक भक्त अन्नदान करणेची इच्छा व्यक्त करतात. अशा इच्छुक भक्तांसाठी मोफत प्रसाद भोजन योजनेअंतर्गत उत्सव कालावधीतील एका दिवसासाठी रु. ८ लाख मात्र व वर्षातील उर्वरीत प्रति दिवसांसाठी रु. ४ लाख मात्र देणगी रक्कम भरुन अन्नदान करणेची सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

# इतर उपक्रम - रुग्णालये

अधिनियमातील कलम १७ व २१ मधील तरतुदीस अनुसरुन, विश्वस्तव्यवस्थेच्या ध्येय-धोरणांशी सुसंगत राहून, संस्थानने श्री साईबाबांची शिकवण व बाबांनी त्यांचे हयातीत गरीब व गरजूंची केलेली रुग्णसेवा लक्षात घेऊन बाबांचा रुग्णसेवेचा वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी शिर्डी व परिसरातील ग्रामीण भागातील सर्वसामान्य, गोर-गरीब जनतेला वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी श्री साईनाथ रुग्णालय तसेच गंभीर आजारावरील उच्च दर्जाचे उपचारांचे सोयीसाठी श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल सुरु केलेले आहे. त्यांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे :-

**श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी**
**SHRI SAINATH HOSPITAL**

समाजातील सर्व गरीब व गरजू रुग्णांची सेवा हे बाबांच्या शिकवणीतले एक मोठे तत्वज्ञान आहे आणि त्यालाच अनुसरुन श्री साईबाबा संस्थान, शिर्डी ने सन १९६४ साली **“ श्री साईनाथ रुग्णालय ”** सुरु केले आहे.

शिर्डी व शिर्डी शहराच्या जवळपास चांगली वैद्यकीय सेवा उपलब्ध नव्हती. श्री साईनाथ रुग्णालयामुळे अशी वैद्यकीय गरज पूर्ण करण्यात आली आहे. सर्व प्रकारच्या गरजू रुग्णांसाठी दिनांक ०१ जानेवारी, २०१७ पासून विनामुल्य वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. सध्या रुग्णालयात विविध विभागांतर्गत ३०० खाटा उपलब्ध असून, यामध्ये ०८ खाटांच्या अतिदक्षता विभागाचाही समावेश आहे. तसेच ०२ सुसज्ज ऑपरेशन थिएटरची सुविधा उपलब्ध करुन देणेत आली आहे.

**(०१) रुग्णालयातील सेवा**

या अत्याधुनिक तंत्रज्ञान व उपकरणाने सुसज्ज असे रुग्णालयात बाह्यरुग्ण, अंतर्रुग्ण, अतिदक्षता, शस्त्रक्रिया, क्ष-किरण, सोनोग्राफी, प्रयोगशाळा आदि विभागांमार्फत गरजु रुग्णांना विविध सेवा अत्यल्प दरात पुरविल्या जातात. मंदिर परिसरातील भक्तांच्या सोयीसाठी मंदिर परिसरामध्ये कायमस्वरुपी प्रथमोपचार केंद्र असून तेथेही प्राथमिक उपचार करणेत येतात. गेल्या ०३ वर्षात रुग्णालयात विविध आजारांवर उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | उपविभागाचे नांव | उपचारार्थी रुग्णांची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | अहवाल वर्ष - | सन २०१७-१८ | सन २०१८-१९ | **सन २०१९-२०** |
| ०१ | बाह्यरुग्ण विभाग | ३,४०,४५७ | ३,६१,९६७ | **३,८३,२६५** |
| ०२ | अंतर्रुग्ण विभाग | १५,९४५ | १५,६२३ | **१६,६५६** |
| ०३ | शस्त्रक्रिया विभाग | १०,९३१ | १२,२६७ | **१३,९६९** |
| ०४ | क्ष-किरण तपासणी (एक्स-रे) | २५,८८७ | २४,०८६ | **२४,२३४** |
| ०५ | सोनोग्राफी तपासणी | ८,०३६ | ६,६३१ | **५,९८८** |
| ०६ | प्रयोगशाळा तपासणी (रक्त/लघवी) | ६५,२११ | ६३,२४५ | **६४,६८६** |
| ०७ | ई.सी.जी. विभाग | २२,५०३ | २०,६४५ | **१९,५३०** |
| ०८ | दंतरोग विभाग रुग्ण | ४,७२२ | ६,६९१ | **६,९९४** |
| ०९ | प्रथमोपचार केंद्र - मंदिर परिसर | ६८,५१३ | ७४,५६६ | **६६,९६५** |
| १० | आय.सी.टी.सी. विभाग | ४,६१८ | ४,४५४ | **६,१६२** |
| ११ | डॉट सेंटर (TB) विभाग | १४८ | २०८ | **१८३** |

श्री साईनाथ रुग्णालयात सर्वांसाठी संपूर्ण वैद्यकिय उपचार विनामुल्य (मोफत) केले जातात. तसेच रुग्णांच्या तातडीच्या सेवेसाठी वाजवी व अल्पदरात २४ तास रुग्णवाहिका व शववाहिनी उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

### (०२) डायबेटीक केअर सेंटर

श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने माहे नोव्हेंबर, २०१२ पासून डायबेटीक केअर सेंटर कार्यान्वित करणेत आलेले आहे. या डायबेटीक केअर सेंटरमध्ये प्रत्येक आठवडयाच्या बुधवारी एक दिवस डायबेटीस रुग्णांना निदान व औषधोपचारा संबधी समुपदेशन तसेच मार्गदर्शन केले जाते. अहवाल सालात **१२,३६७ रुग्णांनी** या सुविधेचा लाभ घेतला आहे.

### (०३) फिरता दवाखाना

श्री साईनाथ रुग्णालयामार्फत शिर्डी पंचक्रोशीतील ग्रामीण भागातील १६ गावांमध्ये फिरते वैद्यकिय पथक पाठविण्यात येऊन अहवाल सालात एकुण **१६,०२५ रुग्णांची** मोफत वैद्यकीय तपासणी करण्यात येऊन औषधोपचाराचा लाभ घेतलेला आहे.

रुग्णालयामार्फत शिर्डी येथील वृध्दाश्रमातील रुग्णांना विनामुल्य वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन दिली जाते. श्री रामनवमी उत्सव काळात शिर्डी - नाशिक या रस्त्यावर पालखीतील पदयात्री साईभक्तांना फिरते वैद्यकिय पथकामार्फत वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन दिली जाते.

## (०४) श्री साईनाथ रक्तपेढी

श्री साईनाथ रुग्णालयाबरोबरच रुग्णसेवेसाठी आधुनिक व अतिशय सुसज्ज अशी श्री साईनाथ रक्तपेढी कार्यरत आहे. सदर रक्तपेढीमार्फत अहमदनगर तसेच आसपासच्या जिल्ह्यातील विविध रुग्णालयांना सेवा पुरविली जाते. शिर्डीमध्ये 'रक्तदान एक चळवळ' उभी राहावी या दृष्टीकोनातून मंदिर परिसरात रक्तपेढीमार्फत रक्तदात्यांसाठी रक्तसंकलन केंद्र सुरु केले आहे.

या रक्तपेढीमध्ये आधुनिक पध्दतीने रक्ताची साठवण करुन गरजू रुग्णांना ते वाजवी दरात त्वरीत उपलब्ध करुन दिले जाते. रक्तदानासारख्या महत्वाच्या दानाविषयी लोकांना जागृत करुन रक्तपेढीने अहवाल सालात **एकूण ११,१११ पिशव्या** रक्त जमा करुन रुग्णांना उपलब्ध करुन देणेत आले आहे.

अहवाल सालात श्री साईनाथ रक्तपेढी मार्फत मंदिर परिसरात **३६६ रक्तदान शिबीरांचे** आयोजन करण्यात येऊन **६,६८९ रक्त पिशव्या** जमा झालेल्या आहेत. याव्यतिरिक्त परिसरातील रक्तपेढयांशी संपर्क साधून, त्यांचे सक्रीय सहभागाने **माहे मे, २०१९ ते मार्च, २०२०** या कालावधीत **एकूण ४२,२५४ पिशव्या** रक्त जमा करणेत आले.

## (०५) वैद्यकिय शिबीरांचे आयोजन

अहवाल सालात, खाली नमुद केलेप्रमाणे विविध वैद्यकिय शिबिरांचे यशस्वीरित्या आयोजन करणेत आले :-

| अ.नं. | शिबिराचे नांव | शिबिर कालावधी | एकुण लाभार्थी रुग्ण संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | किडनी स्टोन शिबीर | २०.०७.२०१९ ते २१.०७.२०१९ | ७४ |
| ०२ | श्रवणयंत्र वाटप शिबीर | ०७.०८.२०१९ ते १०.०८.२०१९ | ३०० |
| ०३ | प्लास्टीक सर्जरी शिबीर | ०९.१२.२०१९ ते ११.१२.२०१९ | ३२ |
| ०४ | चष्मे वाटप शिबीर | १८.०१.२०२० ते २०.०१.२०२० | १००० |

वरील सर्व शिबीरांमध्ये संस्थानचे वैद्यकीय अधिकारी, तांत्रिक कर्मचारी तसेच बाहेरील तज्ञ मानद डॉक्टर्सकडून आवश्यकतेनुसार सर्व सहाय्य दिले जाते. शिबीरांमध्ये उपचार करण्यात येणाऱ्या रुग्णांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क न आकारता त्यांना संपूर्ण वैद्यकीय सेवा, निवास व जेवणाची व्यवस्था विनामूल्य पुरविली जाते.

## (०६) वैद्यकीय आर्थिक मदत व धर्मादाय सेवा

गरीब आणि गरजू रुग्णांना भारतातील धर्मादाय संस्थांनी, निमशासकीय किंवा शासकीय संस्थांनी, सार्वजनिक संस्थांनी, सहकारी संस्थांनी चालविलेल्या रुग्णालयात शस्त्रक्रिया केल्यास / उपचार घेतल्यास एकूण खर्चाच्या १५ टक्के किंवा जास्तीत जास्त रु.२५,०००/- मात्र मदत रुग्णालयाचे नांवे डिमांड ड्राफ्टव्दारे/ आरटीजीएस द्वारे पाठविली जाते. खाली नमूद केलेल्या शस्त्रक्रियांसाठी / आजारावरील उपचारांसाठी संस्थान व्यवस्थापनामार्फत वैद्यकिय आर्थिक मदत (वैद्यकिय अनुदान) दिले जाते :

०१. हृदयशस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
०२. किडनी डायलेसिस, प्रत्यारोपन व नंतरचे उपचार
०३. मेंदुची शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
०४. रक्तासंबंधीचे आजार (उदा. हिमोफिलिया, थॅलेसेमिया)
०५. कर्करोग शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
०६. मणका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
०७. जी.बी.एस. (Guillain Barre Syndrome)
०८. कॉक्लीअर इम्प्लांट (Cochlear Implant)

गेल्या ०३ अहवाल सालात गरजू रुग्णांना उपलब्ध करुन देणेत आलेल्या वैद्यकिय अनुदान रक्कमेचा व लाभार्थी रुग्णांचा गोषवारा खालीलप्रमाणे :

| अ.नं. | आर्थिक वर्ष | अनुदान लाभार्थी रुग्ण संख्या | अनुदान वाटपाची रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ०१ | सन २०१७-२०१८ | ४३० | १,०२,८३,३०२/- |
| ०२ | सन २०१८-२०१९ | ७१० | १,६७,८०,२५०/- |
| **०३** | **सन २०१९-२०२०** | **७२६** | **१,७९,१५,२५०/-** |

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, दिनांक ०१ जानेवारी, २०१७ पासून श्री साईनाथ रुग्णालयात वैद्यकिय उपचार घेणारे सर्व घटकातील गरजू रुग्णांसाठी विनामुल्य (मोफत) वैद्यकिय उपचार सुरु करणेत आले आहेत. विनामुल्य (मोफत) वैद्यकिय उपचारापोटी झालेल्या खर्चाचा मागील तीन वर्षाचा गोषवारा खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | वर्ष | रुग्ण संख्या | रुग्णांवर उपचारापोटी खर्च झालेली रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ०१ | सन २०१७-२०१८ | ३,५६,४०२ | ३,३२,८१,७२६/- |
| ०२ | सन २०१८-२०१९ | ३,७७,५९० | ८,२१,३८,८४४/- |
| ०३ | **सन २०१९-२०२०** | **४,०३,४८३** | **१३,५१,६६,५५७/-** |

## श्री साईबाबा हॉस्पीटल (सुपर स्पेशालिटी), शिर्डी
## SHRI SAIBABA HOSPITAL (SUPER SPECIALITY)

शिर्डी व शिर्डी परिसरातील ग्रामीण भागातील गरीब व गरजू रुग्णांना गंभीर आजार तसेच इतर तपासण्यांसाठी मुंबई, पुणे, नाशिक इत्यादी शहराच्या ठिकाणी जाऊन उपचार घ्यावे लागत असत. या गरीब व गरजू रुग्णांना उच्च दर्जाच्या वैद्यकिय सेवा-सुविधा शिर्डीमध्ये उपलब्ध व्हाव्यात या उदात्त हेतूने मा. व्यवस्थापन समितीने माहे मे २००६ पासून श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल सुरु केले आहे. यामध्ये एकुण २५९ बेड असलेल्या १० अतिदक्षता विभागांचा समावेश आहे. या रुग्णालयाविषयी थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **०१.** | | **रुग्णालयाची क्षमता** | **:** | **२५९ बेडस्** |
| यापैकी | ०१. | हृदयरोग अतिदक्षता विभाग | : | ११ बेडस् |
| | ०२. | सामान्य अतिदक्षता विभाग | : | ११ बेडस् |
| | ०३. | सर्जिकल अतिदक्षता विभाग | : | ०७ बेडस् |
| | ०४. | हृदयरोग रिकव्हरी वार्ड अतिदक्षता युनिट - I | : | २० बेडस् |
| | ०५. | हृदयरोग रिकव्हरी वार्ड युनिट - II | : | १० बेडस् |
| | ०६. | हृदयरोग रिकव्हरी वार्ड (Cardiac Ward) | : | ३७ बेडस् |
| | ०७. | हृदयरोग रिकव्हरी वार्ड (CVTS Ward) | : | ३४ बेडस् |
| | ०८. | निम्न खाजगी कक्ष (MSW) | : | ३७ बेडस् |
| | ०९. | वातानुकूलीत खाजगी कक्ष | : | ०८ बेडस् |
| | १०. | डिलक्स रुम्स | : | ०५ बेडस् |
| | ११. | सामान्य कक्ष (महिला) | : | २८ बेडस् |
| | १२. | ट्वीन शेअरींग बेडस् | : | ३७ बेडस् |
| | १३. | कॅज्युअल्टी इमर्जन्सी केअर | : | १० बेडस् |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **०२.** | | **विविध शस्त्रक्रियेसाठी सुविधा** | **:** | **०७ कक्ष + कॅथलॅब.** |
| | ०१. | हृदय शस्त्रक्रिया कक्ष | - | ०२ |
| | ०२. | अस्थिरोग शस्त्रक्रिया कक्ष | - | ०१ |
| | ०३. | सामान्य शस्त्रक्रिया कक्ष | - | ०२ |
| | ०४. | न्युरो सर्जरी व ट्रॉमॅटॉलॉजी कक्ष | - | ०२ |

## ०३. रुग्णालयात उपलब्ध असणाऱ्या सुविधा :

०१. रेडिओलॉजी विभाग
०२. पॅथॉलॉजी विभाग
०३. डायग्नोस्टिक्स् विभाग
०४. रक्तपेढी
०५. मध्यवर्ती ऑक्सिजन वायुपुरवठा यंत्रणा
०६. लॉन्ड्री
०७. मध्यवर्ती वायु व सक्शन सुविधा
०८. बायोमेडिकल इंजिनिअरींग विभाग
०९. सोलर वॉटर हिटींग यंत्रणा
१०. काही विशिष्ट विभागांसाठी मध्यवर्ती वातानुकूलन यंत्रणा

## ०४. रुग्णालयात उपलब्ध असणाऱ्या रोग निदान चाचण्या व उपचार सेवा :

०१. कार्डिऑलॉजी
०२. कार्डिओ-थोरॅसिक सर्जरी
०३. न्युरो सर्जरी - ट्रॉमॅटॉलॉजी
०४. युरॉलॉजी
०५. नेफ्रॉलॉजी - डायलेसिस
०६. ॲडव्हान्सड् ऑर्थोपेडिक्स्
०७. जनरल मेडिसिन
०८. जनरल सर्जरी
०९. 3 Tesla MRI Machine
१०. 128 Slice CT Scan Machine

## ०५. गेल्या ०३ अहवाल सालात श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये उपचार घेतलेल्या रुग्णांची संख्या :

| अ.नं. | विभाग / उपचार | रुग्णांची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | अहवाल वर्ष - | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० |
| ०१ | बाह्यरुग्ण विभाग | १,६२,९२७ | १,७२,९१८ | **१,९०,१०५** |
| ०२ | अंतर्रुग्ण विभाग | १३,९३२ | १३,१५१ | **१३,६२६** |
| ०३ | विविध प्रकारच्या तपासण्या (MRI, CT Scan, X-Ray, USG, 2D Echo, TMT, Lab, डायलेसिस, ECG, TEE इ. ) | ४,३०,६६२ | ४,६१,७३६ | **४,४३,८५०** |
| ०४ | सी.व्ही.टी.एस. (बायपास, आय.सी.आर., एम.व्ही.आर., डी.व्ही.आर, ए.व्ही.आर., बी.टी. शन्ट, पी.डी.ए., ए.व्ही.एफ., टी.ओ.एफ इ. ) | १,४१३ | १,४१६ | **१,२७३** |
| ०५ | हृदयरोग – अँजिओग्राफी | ३,४७३ | २,८२४ | **३,२९४** |
| ०६ | हृदयरोग – अँजिओप्लास्टी | १,३८३ | १,१४४ | **१,४९९** |
| ०७ | हृदयरोग- बी.एम.व्ही./बी.ए.व्ही/बी.पी.व्ही व इतर | ४१४ | ३१६ | **३५९** |
| ०८ | पीडीए/एएसडी/व्हीएसडी/टिपीएम इत्यादी | २६० | २१६ | **२९२** |

| अ.नं. | विभाग / उपचार | रुग्णांची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | अहवाल वर्ष - | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० |
| ०९ | न्युरो सर्जरी | ६८० | ८२२ | **१,१३१** |
| १० | युरो सर्जरी | ५५२ | ६१७ | **४६७** |
| ११ | अन्य शस्त्रक्रिया (ऑर्थोपेडिक्स, जनरल सर्जरी, दंतरोग, ईएनटी, प्लॅस्टिक सर्जरी, नॅफ्रॉलॉजिस्ट) | २,३६९ | २,४९९ | **२,९७८** |

### ०६. रुग्णालयासाठी औषधे व इतर आवश्यक साहित्य :

श्री साईनाथ व श्री साईबाबा या दोन्ही रुग्णालयांसाठी रुग्णांच्या रोगनिदान व उपचारांसाठी आवश्यक असलेली औषधे, उपकरणे आदि साहित्य खरेदीसाठी मध्यवर्ती औषध भांडार स्थापन करण्यात आलेले आहे. अहवाल सालात, अंदाजे पूर्णांकिंत **रक्कम रु.२५.६१ कोटी मात्रची मशिनरी, औषधे, सर्जिकल इन्स्ट्रुमेंटस, फर्निचर, लिनन व इतर आवश्यक वैद्यकिय उपकरणे व साहित्य** आदि उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

तसेच दोन्ही रुग्णालयाकडील रुग्णांचे कपडे व इतर लिनन स्वच्छ करणे, धुणे व इस्त्री करणे यासाठी स्वतंत्र लॉन्ड्रीची व्यवस्था करण्यात आली आहे.

### ०७. रुग्णालयाचे संगणकीकरण :

श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालय संगणकीय कार्यप्रणालीव्दारे काही प्रमाणात रुग्णांचे बिलींग व काही प्रमाणात मध्यवर्ती औषध भांडार आदी ठिकाणी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

रुग्णांचे रोगनिदान, उपचार पद्धती, व्हिडीओ कॉन्फरन्सींग, सक्षम औषध भांडार व रुग्ण बिलींग याठिकाणी संगणक प्रणाली लवकरच कार्यान्वित करण्याचे विचाराधिन आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयातही संगणक प्रणाली कार्यान्वित करण्याचे विचाराधिन आहे.

### ०८. रुग्णांना वैद्यकिय उपचार बिलातील सवलतीच्या विविध योजना :

### (अ) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना सवलत :-

बी. पी. टी. ॲक्ट, १९५० व मा. उच्च न्यायालयाची योजना, विविध शासकीय योजना, मा. व्यवस्थापन समितीचे नियम तसेच मा.विश्वस्तांच्या शिफारशींनुसार दारिद्रय रेषेखालील गरीब, गरजु व दुर्बल घटकातील रुग्णांच्या वैद्यकिय उपचार बिलात नियमानुसार सवलत देण्यात येत आहे. त्याचा गेल्या ०३ वर्षाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | अहवाल वर्ष | लाभार्थी रुग्णांची संख्या | आर्थिक सवलत रु. (कोटीमध्ये) |
|---|---|---|---|
| ०१ | सन २०१७-१८ | ५२,९८४ | ९.४८ |
| ०२ | सन २०१८-१९ | ४६,७४१ | ९.७३ |
| **०३** | **सन २०१९-२०** | **४७,६१४** | **९.७७** |

**(ब) जीवनदायी आरोग्य योजना व शालेय आरोग्य तपासणी (NRHM) :-**

सदर योजनेच्या अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील, तसेच शालेय विद्यार्थी रुग्णांच्या हृदय शस्त्रक्रिया करणेत येत होत्या. माहे एप्रिल, २०११ पासून NRHM शालेय विद्यार्थी रुग्णांचा जीवनदायी योजनेमध्ये समावेश करणेत आला. माहे फेब्रुवारी २०१३ पासून काही जिल्ह्यामध्ये व माहे नोव्हेंबर २०१३ पासून संपूर्ण महाराष्ट्रात जीनवदायी आरोग्य योजना बंद करण्यात येऊन शासनाने राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना कार्यान्वित केली.

जीवनदायी योजनेअंतर्गत लाभार्थींवर उपचार करण्यात येऊन त्यापोटी शासनाकडून खर्च परतावा येणे बाकी आहे. मागील ०३ वर्षात प्राप्त झालेल्या रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | अहवाल वर्ष | एकुण शस्त्रक्रिया | एकूण बिल रु. (कोटी) | प्राप्त अनुदान रु. (कोटी) |
|---|---|---|---|---|
| ०१ | सन २०१७-१८ | -- | -- | २.९८ |
| ०२ | सन २०१८-१९ | -- | -- | -- |
| **०३** | **सन २०१९-२०** | **--** | **--** | **--** |

दि.३१.०३.२०२० अखेर रु.३.७५ कोटी खर्च परतावा रक्कम प्रलंबित आहे.

**(क) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना) :**

शासनाच्या धोरणानुसार जुनी जीवनदायी योजना बंद करण्यात येऊन, त्याऐवजी, मा. महाराष्ट्र शासनाने सदर योजनेचे नांव बदलून ते आता **“ महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना ”** असे केले आहे.

नवीन महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना ही आरोग्य योजना दिनांक २१ नोव्हेंबर, २०१३ पासून संपूर्ण राज्यात लागू करणेत आलेली आहे. या नवीन योजनेचे कामकाज राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी यांच्या नियंत्रणाखाली, पूर्णत: ऑनलाईन पध्दतीने चालत असल्याने, सदरची योजना रुग्णांसह व्यवस्थापनास कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने अधिक सुलभ आहे. सदर योजनेचा गेल्या ०३ वर्षाचा संक्षिप्त अहवाल खाली नमुद केला आहे **:-**

## लाभार्थी बाह्यरुग्ण (OPD) व अंतर्रुग्णांचा (IPD)
## Free OPD & IPD Investigations

| अ.नं. | तपशील | बाह्य रुग्ण | | अंतर्रुग्ण | |
|---|---|---|---|---|---|
| | | लाभार्थी संख्या | रक्कम रु. | लाभार्थी संख्या | रक्कम रु. |
| ०१ | सन २०१७-२०१८ | १३,४४१ | १,६०,७७,४१२ | ४,५६७ | २९,२०,४४,८०३ |
| ०२ | सन २०१८-२०१९ | १२,९६७ | १,६१,६७,२०३ | ३,९३८ | २८,८२,७८,२६६ |
| **०३** | **सन २०१९-२०२०** | **१२,२६०** | **१,८९,९९,६५३** | **४,५१४** | **२२,५७,७१,४१५** |

